# सुसंवाद

**ऑक्टोबर २०२५**

**चित्पावन आठवले वार्तापत्र**



**दीपावली व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा**



संपादक
सतीश आठवले



उपसंपादक
श्रीकांत आठवले

## मुखपृष्ठ – दीपावली व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा

# चित्पावन आठवले फौंडेशन, पुणे

## कार्यकारी मंडळ
## अनिल महादेव आठवले, अध्यक्ष
## श्रीकांत गोपाळ आठवले, उपाध्यक्ष
## सौ. यशश्री सुयोग आठवले, सचिव

खासगी वितरणासाठी

लेखांमधील मते संबंधित लेखकांची आहेत. संपादक मंडळ त्याच्याशी सहमत असेलच असे नाही.

वेबसाईट: www.chittpavan-athavale.com
ई-मेल: susamvad.caf@gmail.com

# अनुक्रमणिका


१. संपादकीय ४

२. कविता - दीपावली: सौ सुलभा आठवले ५

३. महर्षी व्यास: श्री श्रीकांत आठवले ५

४. वैदिक साहित्य आणि आपण - मनोगत: डॉ अनघा आठवले ७

५. विज्ञान आणि अध्यात्म: संकलन श्री श्रीकांत आठवले ९

६. वैदिक साहित्य आणि पर्यावरण: डॉ अनघा आठवले ९

७. लहरी, स्पंदन, ऊर्जाशक्ती आणि अद्वैत - भाग १: श्री प्रसन्न आठवले ११

८. कविता - भगवान श्रीकृष्ण व ज्ञानेश्वर माउली: सौ सुलभा आठवले १४

९. वैदिक साहित्य आणि मानवी उत्क्रांती: डॉ अनघा आठवले १४

१०. वैदिक साहित्य आणि विज्ञान: डॉ अनघा आठवले १५

११. अचानक बाप्पा घरी आला: श्रीमती सुमति आठवले १६

१२. वैदिक साहित्य आणि सामाजिक व्यवस्था: डॉ अनघा आठवले १७

१३. आवाहन २०

१४. वैदिक साहित्यातील ज्ञानाचे महत्त्व: डॉ अनघा आठवले २०

१५. लहरी, स्पंदन, ऊर्जाशक्ती आणि अद्वैत भाग २: श्री प्रसन्न आठवले २४

१६. वैदिक साहित्य आणि मानस शास्त्र: डॉ अनघा आठवले २६

१६. वैदिक साहित्य आणि आरोग्य, चिकित्सा: डॉ अनघा आठवले २९

१७. आनंदाचे डोही आनंद तरंग: श्रीमती सुमति आठवले ३०

१८. वैदिक साहित्य आणि भांडवलदार: डॉ अनघा आठवले ३१

१९. वैदिक साहित्य आणि आपण - समारोप: डॉ अनघा आठवले ३३

२०. अभिनंदन: डॉ स्मिता आठवले, शैला मुकुंद, आणि नागाव परिवार ३४

२१. चांगल्या गोष्टी, चांगल्या बातम्या: श्री कुमार आठवले ३६

## संपादकीय

आपल्या सुसंवाद ह्या त्रैमासिकाचा हा अंक “दीपावली विशेषांक” म्हणून आपल्या हाती देतांना संपादक मंडळास अत्यंत आनंद होत आहे.

**“ही दीपावली व त्यानंतर येणारे नूतन वर्ष आपणास व आपल्या कुटुंबीयास आनंदाचे व समृद्धीचे जावो ही आपल्या संस्थेतर्फे परमेश्वर चरणी प्रार्थना.”**

या अंकाचे वैशिष्ट्य म्हणजे ह्या अंकातील सर्व लेख हे आपल्या सनातन धर्माच्या, वैदिक तत्वज्ञानावर किंवा त्या विषयी सांगणारे आहेत. डॉ. अनघा आठवले यांचा वेद , गीता या विषयांवर खूप सखोल अभ्यास आहे. त्या वारंवार आपल्या ग्रुपवर या विषयावर लिहित असतात. त्यांचे लेख या अंकात समाविष्ट करण्यात आले आहेत. श्री. पसन्न चिंतामणी ह्यांचे फेसबुक वर येणारे अध्यात्मावरील लेखन बहुतेक सदस्यांनी वाचले असेल. त्यांचेही दोन लेख या अंकात आपणास वाचता येतील. या अंकात श्रीमती सुमतीताई आठवले यांचे लेख दिसतील. सरळ सोप्या शब्दात त्यांचे लिखाण सर्वास आवडेल अशी आशा आहे. त्याच बरोबर आपले सह-संपादक श्री श्रीकांत गोपाळ व त्यांच्या सुविद्या पत्नी सौ सुलभा यांचे लेखनाविषयी वेगळे लिहिण्याची गरज नाही .त्यांचे लेख, कविता प्रत्येक अंकात असतात.

आपल्या सामाजिक जबाबदारीचे भान ठेऊन, फौंडेशनने २०२५-२६ ह्या आर्थिक वर्षात आजपर्यंत १० वी व १२ वी मधे चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे / शिष्यवृत्ती दिली. तसेच 'महाराष्ट्र टाइम्स' आयोजित 'बळ हवे पंखांना' या योजनेतील १० वी उत्तीर्ण झालेल्या ५ गरजू विद्यार्थांना सुद्धा बक्षिसे दिली. त्याशिवाय, पश्चिम महाराष्ट्र व विदर्भातील भीषण पूराच्या संकटात सापडलेल्या नागरिकांना 'जनकल्याण समिती (महाराष्ट्र प्रांत)' यांच्या माध्यमातून 'आपत्ती निवारण निधी' ला भरघोस मदत दिली.

मागेही सांगितल्याप्रमाणे सुसंवाद त्रेमसिकाचा उद्देश आपल्या सदस्यांनी लिहिते व्हावे, त्यांचे अनुभव लोकांना कळावे असा आहे. आम्हास अशा आहे की आपण आमच्या आवाहनास योग्य प्रतिसाद द्याल.

आपण हा अंक वाचाल व आपल्या बर्या वाईट प्रतिक्रिया आमच्या पर्यंत पोचवाल अशी आम्ही आशा करतो.

अंक अधिक वाचनीय व्हावा म्हणून काही सूचना असल्यास जरूर पाठवा .

धन्यवाद

....................................................



## दीपावली

**दिवाळीचे तेजोमय गाणे**
**प्रत्येकानेच गायला हवे**
**आनंदाचे हे मैत्री गीत**
**प्रत्येकानेच जपायला हवे ।।१।।**

**आपली परंपरा, संस्कृती, सणवार**
**आपण करू त्यांचा जयजयकार**
**अवघे हिंदू एक होऊन**
**शिकवत राहू आपले संस्कार ।।२।।**

**प्राण भारतभूमीचा असे**
**वैदिक सनातन हिंदू धर्म**
**नाही केवळ धर्म हा**
**हे विश्वबंधुत्वाचे मर्म ।।३।।**

**दिवाळीचा लखलख प्रकाश**
**असूदे सदा हर्षद, शाश्वत**
**येवो ही आपल्या भारतदेशी**
**अनंतकाळ आपणा सुखावत ।।४।।**





**- सौ सुलभा आठवले, ८८८८८ ११८६१**

**..................................................**

## महर्षी व्यास

**श्रीकांत आठवले, ९८२२६ ०१८०५**

वैदिक वाङ्मय यामध्ये महर्षी व्यास यांचे नाव अग्रक्रमाने येते. हाताच्या बोटावर मोजण्याइतके अपवाद वगळता यांच्यासारखे सर्वदेशी, सर्वस्पर्शी, सर्वंकष असे दुसरे संपन्न व्यक्तिमत्व विश्वसंस्कृतीत नाही. वेदोत्तर कालखंडापासून आजपर्यंत यांचा प्रभाव भारतीय संस्कृतीवर सर्वाधिक राहिला आहे.

धगधगीत वैराग्य, द्रष्टेपण, प्रतिभासंपन्न वाङ्मय, कवित्व, उदात्त साहित्यिक सद्गुण, लोकोत्तर ज्ञान, संकलन - संपादन - समन्वय यांची अपूर्व अंतर्दृष्टी, मानवी जीवनाकडे पाहण्याची स्थितप्रज्ञता, धर्माचे यथार्थ आकलन, आदर्श सद्गुरूंची सद्गुणसंपन्नता, मातृ-पितृवत अढळ भक्ती, नैतिक उत्कर्षाचा ध्यास, परंपरेचा सार्थ अभिमान अशा अनंत लोकोत्तर गुणामुळे हे भारतीय संस्कृतीचे मानदंड ठरले आहेत.

यांनी रचलेल्या आणि संपादित केलेल्या वाङ्मयाला व्यासचर्या असे म्हणतात. धर्मकारण, राजकारण, अर्थकारण, समाजकारण, वाङ्मय, शिक्षण, कला आणि विज्ञान या संस्कृतीच्या अष्टांगांवर  त्यांच्याइतका प्रकाश कोणीही टाकलेला नाही. यांच्या या सर्वदर्शी प्रतिमेमुळेच 'व्यासोचिष्टम जगतसर्वम' अशी म्हण पडली आहे. यांचे 'महाभारत' म्हणजे संपूर्ण मानवी जीवन दर्शन.

वेदांच्या संहितेची रचना, ब्रम्हसूत्रांची निर्मिती, पुराणांची रचना, महाभारत नामक जयस्तंभाची उभारणी व भागवतपुराण असे हे यांचे कर्तृत्व पाहिले की मन थक्क होते. भारतीय संस्कृतीच्या अक्षुण्ण परंपरेचे श्रेय यांना आहे. व्यास हे व्यक्तिमत्व नसून ती उपाधी

असल्याची श्रद्धा आपल्या संस्कृतीत आहे. ही उपाधी धारण केलेल्या महात्म्यांचे, महर्षींचे हे व्यासपीठ आहे.

यांचा जन्म प्रजापती-वसिष्ठाच्या कुळातील आहे. प्रजापतीचा मुलगा मरीची आणि मरीचीचा कश्यप होय. कश्यपाला अदिती पासून मित्रवरूण, अस्ती व देवल असे तीन पुत्र झाले. मित्रवरुणांचे वसिष्ठ व अगस्त्य हे दोन पुत्र होत. वसिष्ठ व अरुंधतीच्या पोटी शक्ती जन्मला. शक्ती व अदृश्यन्ति यांच्या पोटी जो पुत्र झाला तो पराशर महामुनी होय. पराशर व मस्त्यगंदा यांचे पोटी महर्षी व्यास यांचा जन्म झाला. मस्त्यगंधेने वा सत्यवतीने पराशरांबरोबरच्या समागमातून तत्काळ एका पुत्राला जन्म दिला. यमुनेच्या द्वीपात अत्यंत शक्तिशाली पराशरनंदन व्यास उत्पन्न झाले. व्यसाने मातेला म्हटले की 'आवश्यकता वाटल्यास माझे स्मरण कर मी अवश्य दर्शन देईन'. इतके बोलून त्यांनी आपल्या आईचा निरोप घेतला व वडिलांबरोबर तपश्चर्येत आपले मन लावले.

यांची थोरवी आहेकी धर्म-संस्कृतीचची महत्ता व मर्मस्थाने यांना आकळली. वेदराशींचे यांनी विभाजन केले. ऋग्वेदाची संहिता सिद्ध केली. गायनायोग्य ऋचा वेगळ्या करून त्याला सामवेद असे नाव दिले, यज्ञप्रक्रियेच्या तपशीलवार गद्य भागाला यजुर्वेद बनविला. यातुविद्येचे, लौकिक व्यवहाराचे मंत्र एकत्र करून अथर्ववेद सिद्ध केला. अशा प्रकारे वेदाच्या चार वेगळ्या संहिता यांनी तयार केल्या. वेदातील भगवंताचे अगोचर रुपाचे प्रतिपादन यांनी ब्रह्मसूत्रात केले. हे निरूपण सुत्ररूपाने केले असल्यामुळे त्याला ब्रह्मसूत्रे असे म्हणतात. वैदिक प्रस्थानत्रयीत (उपनिषदे, ब्रह्मसूत्रे व गीता) यात ब्रह्मसूत्रे यांचे स्थान प्रधान आहे.

व्यासांच्या महाभारताला केवळ भारतीय वाङ्मयातच नव्हे तर विश्ववाङ्मयात तोड नाही. मानवी जीवनाचे समग्र दर्शन, भाषेची रसाळता, वर्णाची भव्यता या गुणांमुळेच 'भारतं पंचमो वेद:' असा त्याचा गौरव केला जातो. एक लक्ष श्लोकांचा हा ग्रंथ व्यास, वैशम्पायन व सौती यांने निर्माण केला असे परंपरा मानते. नर-नारायण पर्वतांच्या सान्निध्यात असलेल्या बद्रीक्षेत्रात सतत तीन वर्षे लेखन करून व्यासांनेच महाभारत निर्माण केले. महाभारत हा भारताचा सांस्कृतिक महाकोश आहे. कुरुक्षेत्रावरील महाभयंकर युद्धानंतर त्यांनी महाभारत ग्रथित केले. विश्ववाङ्मयातील सर्वश्रेष्ठ महाकाव्य म्हणजे महाभारत! व्यासांच्या वाणीतून उतरलेले आणि गीतेचा उत्कट गंध ल्यालेले पावन कमल म्हणजे महाभारत. विद्यापती गणपती याचा लेखक व्हावा आणि त्यालाही अर्थासाठी विचार करावा लागावा असे श्लोक रचावेत यातच त्यांच्या प्रतिमेची उंची, खोली व व्याप्ती स्पष्ट होते.

महाभारताची रचना करूनही त्यांना पारमार्थीक तृप्तीचा आनंद घेता आला नाही. त्यावर भक्तोत्तम नारद म्हणाले 'हे व्यास मुने तुम्ही महाभारत निर्माण करून चर्तुविध पुरुषार्थाचा मार्ग जनतेला दाखवला खरा पण लोकांच्या मलीन अंतःकरणात भगवंताचे निर्मल यश जेणेकरून प्रस्थापित होईल व त्यांची मने भगवंताकडे वळतील अशा तऱ्हेचा भगवंताचा महिमा तुम्ही अजून वर्णिला नाही. तेव्हा भगवंताच्या यशाचे वर्णन करा म्हणजे तुमचे मन संतुष्ट होईल.' नारदांच्या आज्ञेप्रमाणे त्यांनी अशा तऱ्हेची भागवत संहिता तयार केली. ही संहिता ऐकली असतांना जीवांच्या अंतःकरणातील शोक, मोह, व भय जाते. भगवंताविषयी भक्ती उत्पन्न होते. बारा स्कंध व अठरा हजार शोक असा भागवताचा प्रचंड विस्तार आहे.

दहाव्या स्कंधात त्यांनी श्रीकृष्णाचे परमपावन, लोकोत्तर चरित्र साद्यन्त वर्णिले आहे. अकरावा स्कंध श्रीकृष्ण-उद्धव संवाद आहे. श्रीकृष्णाविषयी त्यांच्या मनात अत्यंत पूज्य भाव व अढळ श्रद्धा आहे. व्यास परंपरेतील शेकडो शिष्यांनी भारतात या अक्षर वांग्मयाचा प्रसार केला.

अशा या महान व परमपूजनीय महात्म्याला शत शत प्रणाम !!!

**व्यासाच्या रुंदीवर वर्तुळाचा परीघ ठरतो. मानवाच्या व्यक्तिमत्वाचा व्यास जितका मोठा , तितके त्याच्या पराक्रमाचे सत्कार्याचे वर्तूळ मोठे.**

**तळटीप**: विद्यावाचस्पति शंकर वासुदेव अभ्यंकर यांच्या वाङ्मय संपदेतून संकलित. साभार !

**श्रीकांत आठवले, ९८२२६ ०१८०५**

..................................................



**डलहौसी, पठाणकोट**

## वैदिक साहित्य आणि आपण

**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**

**वैदिक साहित्य आणि आपण**

**मनोगत**

कोणत्याही धर्माच्या अध्यात्मिक साहित्यात मुख्यत्वे जन्म, मृत्यू, पाप-पुण्य आणि पुनर्जन्म ह्यावर भाष्य केलेले असते. आपले वेद, उपनिषदे आणि श्रीमद्भगवद्गीता ह्याला अपवाद नाही. अध्यात्माचे ज्ञान प्राप्त करत असताना आपण रोजच्या आयुष्यात जगावे कसे ह्या बद्दल चे मार्गदर्शन सुद्धा आपल्याला ह्या साहित्यातून होत असते. वैदिक काळात अधिकृत न्यायपालिका अस्तित्वात असण्याचे उल्लेख नाहीत पण आपले धार्मिक नीतीनियम हे अप्रत्यक्षपणे न्यायपालिकेचे काम करत होते. ऋग्वेदातील मंत्र हेच नैतिकतेचे मूळ. जसे जुगार खेळू नये, तसे केल्यास काय परीणाम होऊ शकतात हे ऋग्वेदाच्या 10 व्या मंडलातील 34 व्या सूक्तात अतिशय विस्ताराने लिहिले आहे. वैदिक साहित्यातील न्यायप्रक्रिया ही औपचारिक व्यवस्थेऐवजी, नैतिक आणि धार्मिक मूल्यांवर आधारित होती. पापपुण्याच्या कल्पना ह्याच साठी निर्माण झाल्या असाव्यात. त्यानंतरच्या काळात मनु, याज्ञवल्क्य, बृहस्पति, नारद, शुक्र इत्यादी स्मृतिकारांनी विधिवत नियम तयार केले.

आधुनिक काळात संस्कृतचे गाढे अभ्यासक, महामहोपाध्याय, पुणे आणि अलाहाबाद विद्यापीठांकडून डी.लिट. पदवीने सन्मानित, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू, लंडन युनिव्हर्सिटीच्या 'ओरिएंटल एंड आफ्रिकन स्टडीज' चे सन्माननीय फेलो, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते, राज्यसभा सदस्य, भारतरत्न डॉ. पांडुरंग वामन काणे ह्यांनी 'History of Dharmashastra', किंवा 'प्राचीन भारतीय न्यायव्यवस्था' असे ग्रंथ लिहून ह्या विषयाची चांगलीच चर्चा केली आहे. ह्या

अनुषंगाने डॉ. पांडुरंग वामन काणे यांनी 'कात्यायन स्मृती' चा अतिशय गौरवाने उल्लेख केला आहे. धार्मिक, सामाजिक, नागरी कायदे बनवताना भारतीय संसदेनेही मार्गदर्शक म्हणून वेळोवेळी History of Dharmashastra चा आधार घेतला आहे.

जेव्हा इतर *Religion* अस्तित्वात नव्हते तेव्हा धर्म म्हणजे आपले कर्तव्य असाच अर्थ प्रचलित होता.आपले वैदिक साहित्य आपल्या हिंदू संस्कृतीचे प्रतिबिंब आहेत.  धर्म हा आपल्या संस्कृतीचाच एक भाग आहे**.**

**हिंदू धर्म, हा खरे तर धर्म (Religion) नसून ती एक जीवनशैली आहे असे आपल्या सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे. कारण धर्म म्हटले की त्याचा धर्मसंस्थापक आणि धर्मग्रंथ असावा लागतो जसे शिख धर्माचे संस्थापक, गुरू गोविंद सिंह जी आणि धर्मग्रंथ, ग्रंथसाहिबा. हिन्दू धर्म कोणीही स्थापन केला नाही. आपले वेद अपौरुषेय म्हणजे अमानवीय म्हणजेच ब्रह्मा च्या मुखातून ऋषींनी ऐकले असेच आपण मानतो. हिन्दू हा शब्द सुद्धा सिंधू संस्कृती मुळे ब्रिटिशांनी आपल्याला दिला असा मतप्रवाह आहे.**

इतक्या प्राचीन आणि दैवी साहित्याचा आजच्या घडीला काय उपयोग असा प्रश्न काहींना पडतो. ज्या  भारतीय संविधानाला आपण मानतो त्यामधील मुख्य तत्व म्हणजे 'समता' हे थोड्या वेगळ्या पद्धतीने आपल्याला श्रीमद्भगवद्गीतेच्या 12 व्या अध्यायात वाचायला मिळते.

आधुनिक शास्त्रातील अनेक सत्य, आपल्याला दाखले किंवा भाष्य स्वरूपात  आपल्या वैदिक साहित्यात आपल्याला वाचायला मिळतात. आपण ज्याला शोध लावणे म्हणजे *discovery* आणि *invention* हे कोणत्या स्वरूपात लोकांसमोर येत होते ह्याची मला निश्चित माहिती नाही. आजच्या सारखे बौद्धिक संपदा किंवा पेटंट असे काही नक्कीच अस्तित्वात नव्हते. उलट दिल्याने ज्ञान वाढते अशीच विचारसरणी होती. गुरुकुलात 12 वर्षे राहून 64 कलांचे (skills) शिक्षण मिळत असे. गुरु आपल्या शिष्यांची पारख करून त्याला योग्य शिक्षण देत असत. म्हणूनच अर्जुनाला धनुर्विद्या आणि भीमाला गदायुद्धाचे शिक्षण मिळाले.

आश्रमात शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शिष्य आपापल्या परीने गुरूदक्षिणा देत असत. शिक्षणाचा बाजार ही कल्पना नव्हतीच. श्रीमद्भगवद्गीतेच्या 4थ्या अध्यायातील 3ऱ्या श्लोकात, पात्र व्यक्तीस ज्ञान द्यावे, म्हणून श्रीभगवानकृष्ण अर्जुनाला प्राचीन योगाचे रहस्य सांगत आहेत असे म्हटले आहे. तसेच अथर्वशीर्षातील 14 व्या मंत्रात मोहमयी जगात राहणाऱ्या पापी व्यक्तीस अथर्वशीर्षाचे ज्ञान देऊ नये असे म्हटले आहे. थोडक्यात ज्ञान देण्यापूर्वी शिष्यांची नीट पारख करून घ्यावी. ह्यासंदर्भात  एक गमतीदार मंत्र प्रश्नोपनिषदातील 1. 2 मध्ये वाचायला मिळतो.

**तान् ह स ऋषिरुवाच भूय एव तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया संवत्सरं संवत्स्यथ यथाकामं प्रश्नान् पृच्छत यदि विज्ञास्यामः सर्वं ह वो वक्ष्याम इति ॥ प्रश्नोपनिषद 1. 2 ॥**

ते ऋषी (पिप्पलाद) त्यांना (शिष्यांना) असे म्हणाले की अजून एक वर्षभर श्रद्धेने ब्रह्मचर्य पाळून तपाचरण करून येथेच रहावे, मग आपापल्या इच्छेने प्रश्न विचारावे जर आम्हाला माहीत असेल तर निश्चितच आम्ही त्याचे स्पष्टीकरण देऊ.

आज आपल्या समोर पर्यावरणाचा ऱ्हास, भ्रष्टाचार, नीतिमत्तेचा ऱ्हास, जातीयता आणि धार्मिक तेढ, हिंसाचार अशी भयंकर आव्हाने आहेत. ह्या पार्श्वभूमीवर आपल्या वैदिक साहित्यात काय काय लिहून ठेवले आहे, ज्यायोगे आपल्या संस्कृतीची यथाशक्ती ओळख करून देण्याचा हा छोटासा प्रयत्न. ज्ञान दिल्याने वाढते तसेच, दिल्याने आनंद सुद्धा वाढतो. दिवाळीच्या ह्या शुभमुहूर्तावर पर्यावरण पूर्वक दिवाळी साजरी करून आपला आनंद द्विगुणित करूया.

आठवले परीवारातील सर्व पूर्वज, विशेषतः परमपूज्य वरदानंद भारती आणि परमपूज्य पांडुरंगशास्त्री यांना विनम्र अभिवादन करून लेखन कार्यास सुरवात करते.

**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**

.................................................

## विज्ञान आणि अध्यात्म

**विज्ञान आणि अध्यात्म**

१. विज्ञान प्रयोगातून विकसित होते
अध्यात्म योगातून प्राप्त होते
२. विज्ञानामध्ये तपशीलवर भर आहे
अध्यात्मामध्ये तप व शील यावर भर आहे
३. विज्ञानासाठी साधने वापरली जातात
अध्यात्मासाठी साधना वापरली जाते
४. विज्ञानामध्ये शोध आहे
अध्यात्मामध्ये बोध आहे
५. विज्ञानामध्ये नवसृष्टी विकसित होते
अध्यात्मामध्ये नवदृष्टी विकसित होते
६. विज्ञानामध्ये तत्वपरीक्षा असते
अध्यात्मामध्ये सत्वपरीक्षा असते
७. विज्ञानामध्ये तंत्रज्ञान असते
अध्यात्मामध्ये आत्मज्ञान असते
८. विज्ञानामध्ये प्रकल्प आहेत
अध्यात्मामध्ये संकल्प आहेत
९. विज्ञानामध्ये शक्ती आहे
अध्यात्मामध्ये भक्ती आहे
१०. विज्ञानामध्ये व्यासंग आहे
अध्यात्मामध्ये सत्संग आहे
११. विज्ञानामुळे धन निर्माण होते
अध्यात्मामुळे समाधान निर्माण होते

श्रीक्षेत्र शेगांव येथील आनंदसागर मधे एके ठिकाणी हा मजकूर आहे

**संकलन: श्रीकांत आठवले ९८२२६ ०१८०५**

## वैदिक साहित्य आणि पर्यावरण

**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**

**वैदिक साहित्य आणि पर्यावरण**

भारत माझा देश आहे असे आपण अभिमानाने म्हणतो तेव्हा ह्या देशातील संसाधने आपली असतात ज्यांची योग्य ती काळजी घेणे आपले कर्तव्य आहे. आपल्या सोयीसाठी आपण सार्वजनिक मालमत्ता आणि खाजगी मालमत्ता अशी विभागणी केली आहे. आदिवासींच्या जगात अगदी आतापर्यंत सर्व काही, म्हणजे जंगल संपत्ती ही सर्वांच्या मालकीची होती. पैसे दिले की एखादी मालमत्ता आपण आपल्या नावावर करून घेऊ शकतो आणि त्यावर मालकी हक्क बजावतो. आपला अहंकार सुद्धा थोडासा सुखावत असतो. पण कोणतीही मालमत्ता आपण निर्माण करू शकत नाही. आपल्या श्रुतींमधे संसाधनांच्या वापराबद्दल बद्दल काय लिहिले आहे?

ईशावास्योपनिषदातील पहिल्या मंत्राचे अध्ययन ह्या दृष्टीने महत्त्वाचे वाटते.

**ईशा वास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत्।
तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्यस्विद्धनम्
॥1।।**

ईशा वास्यमिदं सर्वम् ह्या शब्दांमुळे ईशावास्योपनिषद असे नाव असलेल्या ह्या उपनिषदाच्या माध्यमातून ज्ञानाचे आणि उपदेशांचे/दृष्टि चे मिळालेले हे जणू भांडारच आहे. शुक्ल यजुर्वेदाच्या 39 व्या संहितेनंतरचा 40वा अध्याय म्हणजेच हे उपनिषद ज्याचे नावच आत्मज्ञान असे आहे.

ईशावास्य ह्या शब्दापासून सुरवात झालेला हा श्लोक. ईश शब्दाच्या तृतीया विभक्तीने ईशा म्हणजे ईश्वराकडून सगळी कडे व्यापलेले हे जग. ईश्वराचे सर्वव्यापी अस्तित्व दर्शवतो. वास्य म्हणजे आच्छादन हे नेहमीच आच्छादित गोष्टींपेक्षा मोठे असते म्हणजेच ईश्वर सर्वश्रेष्ठ

आहे.  श्रीमद्भगवद्गीते मधे परमेश्वर अणूरेणूत भरलेला आहे असे सांगितले आहेच.

जगती ह्या शब्दाचा अर्थ पृथ्वी असा असला तरी त्यामधून गती सूचित केली आहे. सूर्याभोवती आणि स्वतः भोवती पृथ्वी फिरते हे तर वैज्ञानिक सत्य. त्यामुळे पृथ्वीवरील सर्वच गतीमान आहे.

हे सर्व काही ईश्वराचेच आहे हा विचार कश्मीर शैव तत्वज्ञान, अद्वैत वाद ह्या मध्ये सुद्धा सांगितलेला आहेच.

ईश म्हणजे स्वामी. ईशा आवास्यम् म्हणजे ह्या जगताचा आधार असा सुद्धा दुसरा अर्थ लावता येईल. जेथे गती आहे तेथे शक्ती सुद्धा आहे. शक्ती हे शिवाचे अर्धांग. चेतना शक्ती चराचरात भरून राहिली आहे हे विधान अगदी योग्य आहे.

लोकशाहीतील सर्वात महत्वाचे मूल्य म्हणजे सार्वजनिक विश्वास. (पब्लिक ट्रस्ट).

आपल्या सर्वांना ट्रस्ट हि कल्पना माहीत आहे. आपला देश, ह्या देशातील सर्व संसाधने हि सर्व नागरिकांची आहेत असे मानले जाते. त्यामुळेच सरकारने ह्या देशाला पब्लिक ट्रस्ट असे मानून काम करणे अपेक्षित आहे. आपल्या नद्या, पर्वत, जंगले हे सर्वांचे आहे.

हि कल्पना आली कुठून? असा विचार केला तर त्याचे मूळ ईशावास्योपनिषदाच्या ह्या पहिल्या श्लोकात असावे असे वाटते. मार्क्सवादाचे सुद्धा मूळ तत्व 'सर्वांचा मालकी हक्क ' हेच आहे.

सर्व काही ईश्वराचेच आहे असे सांगून झाल्यावर, त्याचा उपभोग घ्या असे म्हटले आहे. पण हा उपभोग कसा घ्यावा? केवळ भोगभाव मनात नसावा तर त्याच बरोबर कृतज्ञ किंवा आदरभाव पण असावा, त्याबरोबर भक्तीभाव असणार आहेच.

आपली आई आपले संगोपन करते तर ही सृष्टी आपल्या संगोपनाचे नियोजन करते. नैसर्गिक संसाधनांचा उपभोग घेताना त्याकडे मातेच्या आदरभावाने पाहणे अपेक्षित आहे. भूमाता, गंगामाता, तुलसीमाता ह्या शब्दांमागे असाच कृतज्ञ भाव आहे.

अनासक्त राहून केलेल्या कर्माचे बंधन रहात नाही असे आपण श्रीमद्भगवद्गीतेत वाचले आहे. उलट हे ईश्वराच्या जवळ जाण्याचे साधन ठरते. म्हणजेच निष्काम कर्मयोगाचा पुरस्कार ह्या उपनिषदात सुद्धा केला आहे. ह्या ईश्वरमय जगाचा त्यागपूर्वक भोग घ्यायचा आहे म्हणजेच आपल्या मधील स्वार्थ आणि अहंकाराचा त्याग करायचा आहे. जी गोष्ट आपण निर्माण केलेली नाही त्यावर कोणाचाच हक्क नाही म्हणूनच कर्मयोगातील स्थितप्रज्ञता अंगिकारली पाहिजे.

कोणी वंचित तर राहू नये पण त्याची आसक्ती असू नये. गीतेच्या 3.37 श्लोकात सांगितल्याप्रमाणे माणसामध्ये रजोगुणाचे प्राबल्य असेल तर अभिलाषा निर्माण होते. गीतेच्या 3.11 व्या श्लोकात पंचमहाभूतांचा आदर करा असे सांगितले आहेच.

ह्या मंत्राचा थोडक्यात अर्थ असा की हे सर्व जग ईश्वराचे आवास आहे, ह्या सर्वाचा त्याग करून उपभोग घेतला पाहिजे. दुसऱ्या कोणाच्याही संपत्ती ची लालसा ठेवू नकोस.

आता आपण वर उल्लेख केलेल्या श्रीमद्भगवद्गीतेच्या 3 ऱ्या अध्यायातील 11 व्या श्लोकात काय सांगितले आहे ते पाहू.

पंचमहाभूतांशिवाय आपले जगणे अशक्य आहे. आपण पंचमहाभूते निर्माण करू शकत नाही. त्यामुळे पंचमहाभूतांचा आदर करणे आपले कर्तव्य आहे. श्रीभगवानकृष्ण आपल्याकडून एवढी सुद्धा अपेक्षा ठेवत नाही.

**देवान्भावयतानेन ते देवा भावयन्तु वः |**
**परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ**
**||श्रीमद्भगवद्गीता 3.11||**

हा श्लोक वाचल्यावर एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ हया उक्ती ची आठवण येते. पंचमहाभूते, जसे जल वायू तेज आकाश आणि पृथ्वी यांनाच देवता मानले जाते. ऋग्वेदात

इन्द्रदेवांचा उल्लेख बऱ्याच ठिकाणी आला आहे. ब्रह्मदेवाने विश्वनिर्मिती केल्यानंतर आपले जीवन सुरळीत चालू रहावे हया साठी सांगितलेला कानमंत्रच जणू. आपले पर्यावरण सुरक्षित ठेवले तर आपल्याला फायदा होणार आहे हे महर्षी व्यासांनी लिहून ठेवले आहे हे विशेष.

हया श्लोकात मनुष्य आणि देवता यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट केला आहे , ज्यामध्ये देव यज्ञामुळे (यज्ञ ही खूप मोठी संकल्पना आहे, केवळ यज्ञकुंडात आहुती देणे एवढीच ती मर्यादित नाही) मनुष्याला अन्न देतात आणि मनुष्य देवाला यज्ञ अर्पण करून त्यांचे पोषण करतो. या परस्परावलंबी व्यवस्थेतून मनुष्य आणि देव दोघेही एकमेकांचे पालन करतात. श्रीभगवानकृष्ण अर्जुनाला असे सांगत आहेत की या यज्ञादवारे तुम्ही देवतांची उन्नती करा आणि देवता सुदधा तुम्हाला उपकारक ठरतील. अशा प्रकारे एकमेकांचा विकास करून कल्याण साधले जाईल.

आपल्या पर्यावरणाचे रक्षण करा असा महत्त्वपूर्ण संदेश ह्या श्लोका द्वारे आपणास मिळतो.

**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**

...................................................



## लहरी, स्पंदनं, ऊर्जा शक्ती आणि अद्वैत – भाग १

**प्रसन्न आठवले, 9049353809**

संपूर्ण विश्व हे अनेक प्रकारच्या लहरी व स्पंदनं अर्थात vibration आणि waves यावर चालतं. आधुनिक विज्ञानाने ते सिद्ध केलं आहे आणि त्या विज्ञानाचा पाया तोच आहे. हाच मुद्दा आजच्या लेखात तुलनात्मक दृष्टीने आणि अध्यात्मिक माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**१) विज्ञानाच्या दृष्टीने:** लहरींना ऊर्जा लागतेच. ध्वनीलहरींना माध्यम (हवा/पाणी) आणि त्यातील कणांच्या दोलनाची ऊर्जा लागते. विद्युतचुंबकीय लहरींना (प्रकाश, रेडिओ waves) माध्यमाची गरज नाही, पण त्याही ऊर्जा वाहतात (फोटॉन्स).
म्हणजेच लहरींचं अस्तित्व = ऊर्जा प्रवाह.

**२) अध्यात्मिक दृष्टीने:** भारतीय तत्त्वज्ञानात देह, मन, वाचा, बुद्धी यांचा आधार वेगवेगळ्या ऊर्जा किंवा शक्तीं आहेत. त्या खालील प्रकारे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

२.१ **प्राणशक्ती:** हीच जीवनाची मूलभूत ऊर्जा मानली जाते. श्वास, नाडी, हृदयाचे ठोके, स्नायूंची हालचाल, रक्ताभिसरण, हे सर्व प्राणशक्तीवर चालते. देह आणि वाचा (शब्द उच्चार) प्रामुख्याने प्राणाच्या ऊर्जेवर अवलंबून.

२.२ **मनशक्ती :** विचार, भावना, संकल्प-कल्पना यांचे लहरी रूप. हे भौतिक रूपात संप्रेरके किंवा हार्मोन्स सर्व शरीरात प्रवाहित होतात. तर vibrations स्वरूपात आसमंतात प्रसारित होतात. म्हणूनच ठराविक विचारांनी

ठराविक प्रकारची हार्मोन्स शरीरात निर्माण होतात. जी शरीराचं संतुलन राखतात. पण चुकीच्या लहरी निर्माण झाल्यास, चुकीची हार्मोन्स निर्माण होऊन, शरीरात असंतुलन निर्माण करतात.
मनाच्या लहरींना "चित्तवृत्ती" म्हणतात. या लहरी चेतनेच्या (चिद्-शक्तीच्या) आधारे निर्माण होतात.

२.३ **वाग्देवीची शक्ती / वाचा शक्ती:** वाणी ही शब्दावाटे ध्वनीलहरींच्या रूपात आहे. पण तिच्या मागे संकल्पशक्ती + प्राणशक्ती यांचा संयोग असतो. अर्थात प्रत्येक बोलण्यामागे किंवा उच्चारणामागे संकल्प शक्ती कार्यरत असते. म्हणून प्रत्येक शब्द उच्चारताना विवेक व विचार असावा. कारण प्रत्येक लहरींमागे एक एनर्जी अर्थात ऊर्जाशक्ती कार्य करते. ती शक्ती नकळत त्या लहरींना आपल्या लक्षापर्यंत नेते. त्यामुळेच "मंत्रोच्चार" प्रभावी ठरतो. पण चुकीचे शब्दोच्चार सुद्धा प्रभावी ठरतात.

२.४ **बुद्धिशक्ती:** तर्क, विवेक, निर्णय घेण्याची प्रक्रिया हे सत्त्वगुणप्रधान ऊर्जेने कार्य करतात. कुतर्क, अविवेक, वासना, ही तमोगुणप्रधान ऊर्जेने कार्य करतात.
बुद्धी म्हणजे सूक्ष्म स्तरावर "चैतन्याच्या प्रकाशाने उजळलेलं मन."

२.५ **मूळ ऊर्जा – चैतन्य/आत्मशक्ति / परम शक्तीची अंश शक्ती:** योगशास्त्रात सांगतात की, या सर्व ऊर्जांचा आधार चैतन्य आहे. चैतन्य या देहाच्या, विचारांच्या, बुद्धीच्या आणि वाणीच्या सर्व शक्तींचा मूळ स्रोत आहे. म्हणजेच मुख्य पॉवर स्टेशन.
चैतन्य म्हणजेच परम ऊर्जा (सर्वव्यापी स्पंदन), ज्यात प्राण, मन, बुद्धी हे माध्यमं होतात.

**३) संक्षेप**
देह आणि वाचा → प्राणशक्तीवर चालतात.
मन → चिद्-शक्तीच्या संकल्पलहरींवर चालतं.
बुद्धी → विवेकाची सूक्ष्म ऊर्जाशक्ती (सत्त्वप्रधान चैतन्य).
सर्वांचा आधार → आत्मशक्ति / ब्रह्मशक्ति (सर्वव्यापी स्पंदनात्मक ऊर्जा).

म्हणजे, जशी विज्ञानात waves ना प्रवाही होण्यासाठी, प्रवासासाठी energy carrier लागतो (mechanical medium किंवा electromagnetic field), त्याचप्रमाणे अध्यात्मिक दृष्टीने प्राण + चैतन्यशक्ति ही देह, मन, वाचा, बुद्धी यामधल्या लहरींना वाहून नेते.

**आता आपण द्वैत आणि अद्वैत यांचा विचार करण्याचा प्रयत्न करूया.**

**१) विश्वातील ऊर्जा आणि देहातील आत्मशक्ति**

विश्वातील ऊर्जा / परम चैतन्यशक्ति → वेद-उपनिषदांत याला परब्रह्म, परमात्मा, चिदाकाश म्हणतात.
देहातील आत्मशक्ति → आपण अनुभवतो त्या स्वरूपात ती जीवात्मा किंवा प्राणचैतन्य म्हणून व्यक्त होते. ही देहाला चालवते.

खरंतर या दोन्हींमध्ये फरक नाही. पण अज्ञानामुळे जीवाला आपलं अस्तित्व स्वतंत्र वाटतं. देहाच्या विचारांच्या बुद्धीच्या मर्यादांमुळे तसा प्रत्यय येतो. जो बुद्धीला मनाला झालेला भ्रम आहे. हेच द्वैत आहे. मी आणि परम आत्मा हे भिन्न आहेत, असा बुद्धीचा भ्रम फक्त देहाच्या वेगळ्या अस्तित्वाने आणि ज्ञानेंद्रियांच्या मर्यादांमुळे निर्माण होतो.
आता यातून

**२) संतुलन कसं साधायचं?**

(अ) **योगशास्त्रीय दृष्टीने**

**प्राणायाम:** श्वासावर नियंत्रण मिळवून प्राणशक्ती संतुलित केली की, देह आणि मन एकसंध होतात.
**ध्यान:** मनाच्या लहरी (चित्तवृत्ती) शांत केल्या की आत्मशक्ति विश्वचैतन्याशी आपोआप एकरूप होते.
**साधना:** जप, मंत्र, कीर्तन, सेवा यांमुळे अहंकार विरळ होतो, आत्मा व विश्व यांचं भेदक आवरण नष्ट होतं.

अर्थात हे लिहिलय, तितकं सहज सोप्प नाही. पण ज्ञानाने, प्रयासाने आणि आवृत्तीने प्राप्त आहे.

(ब) **तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने**
शंकराचार्य सांगतात : "ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या, जीवो ब्रह्मैव नापरः"
म्हणजे जीव आणि ब्रह्म यांच्यात भेद नाही.

जेव्हा साधकाला "मी आणि विश्व वेगळे नाही" हा अनुभव येतो, तेव्हा संतुलन पूर्ण होतं. द्वैत नष्ट होतं. हीच ज्ञानाची परमोच्च अवस्था आहे. या अवस्थेला येण्यासाठी अनेक जन्मांची, ज्ञानाची, कर्माची आणि भक्तीची अनुभूती, प्रचिती यावी लागते. सद्गुरू कृपा साधावी लागते.

(क) **आधुनिक विज्ञानाशी तुलना**
विज्ञान सांगतं: ऊर्जा निर्माण होत नाही, नष्ट होत नाही – ती फक्त रूपांतरित होते.

तसेच अध्यात्म सांगतं की, आत्मा निर्माण होत नाही आणि नष्ट होत नाही. म्हणजेच मूळ आत्मरूप ऊर्जाशक्ती किंवा एनर्जी ही फक्त माध्यमं किंवा साधनं बदलते. देहरूप अथवा देहरहित स्वरूप यातून प्रवास करते. अर्थात वैज्ञानिक अर्थाने सुद्धा नष्ट होत नाही फक्त रूपांतरित होते.

**३) हेच अद्वैत आहे का?**

हो. जेव्हा आत्मशक्ति (जीवात्मा) आणि विश्वातील चैतन्यशक्ति (परमात्मा) यांच्यातील "भेद" मनातून नाहीसा होतो, तेव्हा त्या अवस्थेला अद्वैत अनुभूती म्हणतात. किंबहुना या दोन्हीत भेद नाही याची जाणीव होते, ती अद्वैत अवस्था.

संत, ऋषी, योगी यांना ध्यानसाधनेत अशी अनुभूती येते की — "मी लाट नाही, मी महासागर आहे."

**४) सोप्या भाषेत**

**द्वैत:** मला वाटतं "मी" आणि "विश्व चैतन्य" वेगळं आहे. मी म्हणजे देह आणि विश्व चैतन्य म्हणजे ब्रम्हांडाबाहेरील किंवा देहाबाहेरील कोणतीतरी अज्ञात शक्ती.

संतुलनाचा टप्पा: साधनेतून मला जाणवतं की माझ्यातली ऊर्जा आणि विश्वातील ऊर्जा एकाच स्वरातून येते. मी त्याच संपूर्ण वैश्विक शक्तीचा अंश आहे आणि त्या अर्थाने मी अंशरूप परब्रह्म आहे.

**अद्वैत:** प्रत्यक्ष अनुभूती – "मी आणि विश्व एकच आहे."

म्हणजेच, आत्मशक्ति आणि परमशक्ति यांचं संतुलन साधणं = अहंकार विरघळणं = अद्वैत अनुभव= मन आत्म्याशी आणि आत्मा परमात्म्याशी एकरूप होणं.

विषय गहन आहे, मोठा आहे आणि आजचा लेख अपूर्ण आहे. त्यामुळे यावर नक्की पुन्हा लिहिणं होईलच. पण आज इथेच थांबू.

**संकल्पना संकलन आणि लेखन प्रसन्न आठवले**
**9049353809, 9960762179**

**..................................................**

## भगवान श्रीकृष्ण व ज्ञानेश्वर माउली

भगवंत श्रीकृष्ण
पूर्णब्रह्म योगेश्वर
प्रकटले पुनरपि
होऊन ज्ञानेश्वर.

गीतामृत वदले
संस्कृत देव भाषेत
ज्ञानेश्वरांनी गाईले
ते प्राकृत भाषेत.

श्रीकृष्ण पूर्णावतार
भक्तांसाठी साउली
ज्ञानदेव आले होऊन
भक्तांसाठी माउली.

पसायदान रूपे
लिहिली विश्वप्रार्थना
जगाचे कल्याणा
आपली राष्ट्रप्रार्थना

माउलींचा भक्तियोग
आनंदाचे आवारु
माउली सदासर्वदा
भक्त जनांना आधारु

**- सौ सुलभा आठवले, ८८८८८ ११८६१**

**..................................................**

## वैदिक साहित्य आणि मानवी उत्क्रांती

**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**

**वैदिक साहित्य आणि मानवी उत्क्रांती**
सजीवांचे जग आणि सृष्टी कशी निर्माण झाली ह्याचे कुतुहल सर्वांनाच असते. त्याचे वर्णन श्रुतींच्या अनेक मंत्रात सापडते. त्यापैकी प्रश्नोपनिषदातील एक मंत्र आपण पाहू.

**तस्मै स होवाच प्रजाकामो वै प्रजापतिः स तपोऽतप्यत स तपस्तप्त्वा स मिथुनमुत्पादयते । रयिं च प्राणं च इति, एतौ मे बहुधा प्रजाः करिष्यत इति ॥ प्रश्नोपनिषद्। 1.4॥**

प्रत्येक संस्कृती मध्ये, धर्मामध्ये, प्रथम पुरुष आणि प्रथम स्त्री ह्याबद्दल काहीना काही लिहून ठेवले आहे जसे ॲडम आणि ईव्ह, यिन आणि यांग, इझानागी आणि इझानामी वगैरे. हिन्दू संस्कृतीत सुद्धा प्रथम पुरुष आणि प्रथम स्त्री च्या कल्पना आहेतच. काश्मीर शैव पंथानुसार 'इ' म्हणजे शक्तीचे रूप पार्वती. तिच्या शिवाय शंकर महादेव म्हणजे नुसतेच 'शव '. तत्त्वबोध ह्या आदी शंकराचार्यांनी लिहिलेल्या ग्रंथातील ३ ऱ्या अध्यायात संपूर्ण जगताची निर्मिती कशी झाली हे विस्ताराने सांगितले आहे. ब्राह्मण आणि त्याबरोबर असणारी माया शक्ती, त्यानंतर निर्माण झालेली चोवीस तत्वे ह्या सर्वांचे वर्णन केले आहे. प्रश्नोपनिषदातील ह्या मंत्रात आपल्या स्थूल शरीराच्या निर्मितीचे स्पष्टीकरण दिले आहे.
ह्या मंत्रात ऋषी काय म्हणतात ते पाहू.
प्राण म्हणजे चैतन्यशक्ती, ऊर्जा आणि रयि म्हणजे पदार्थ ह्या गोष्टींचा ह्या मंत्रात उल्लेख केला आहे. प्रजापती म्हणजे सर्व जन्मलेल्या प्राण्यांचा किंवा सजीवांचा स्वामी. प्रजापती म्हणजे पशुपती म्हणजेच शिवा. त्यांनी हे स्थूल जग निर्माण करण्यापूर्वी बराच विचार केला असणार त्याशिवाय इतके वैविध्यपूर्ण सजीव निर्माण झाले नसते. एक प्रकारची तपश्चर्याच ती. तप म्हणजे कठोर प्रयत्न. डार्विन च्या

उत्क्रांतीच्या सिद्धांताचा येथे आधीच उल्लेख केला आहे असे म्हटले तर ती अतिशयोक्ती नव्हे. नैसर्गिक निवडीच्या प्रक्रियेद्वारे निरनिराळ्या प्रजाती विकसित झाल्या. प्रजातींमधील व्यक्तींमध्ये नैसर्गिकरित्या विविधता आढळते, हळूहळू प्रजातींमध्ये बदल घडतात, ज्यामुळे नवीन प्रजाती तयार होतात. असे डार्विन ने सांगितले. श्रीभगवानविष्णूंचे सुरवातीचे अवतार आणि आधुनिक उत्क्रांती चे शास्त्र हे तत्वतः एकमेकांशी जुळते आहे असे वाटते. प्रत्येक प्राण्यांचे आणि वनस्पतींचे रंग आकार इतके सुबक, देखणे. प्रत्येक अवयवांचे कार्य सुद्धा चपखल. नेमके हेच ह्या मंत्रात सुद्धा म्हटले आहे.

डार्विन ने जर सजीवांच्या उत्क्रांती चा अभ्यास मांडला असे म्हटले तर वैदिक तत्त्वज्ञानात अध्यात्मिक उत्क्रांती चे वर्णन केले आहे असे म्हणता येईल.

भगवान शंकर हे चराचराचे स्वामी आहेत. पृथ्वी सूर्याभोवती फिरत असल्याने प्रत्येक गोष्ट ही चर आहे. अगदी वरवर निर्जीव वाटणाऱ्या दगडात सुद्धा अणूरेणूंची हालचाल सुरू असते हे वैज्ञानिक सत्य. हि हालचाल घडवून आणली जाते प्राणशक्तीमुळे. म्हणजेच पिप्पलाद ऋषींचे उत्तर पूर्णपणे वैज्ञानिक आहे.

ह्या मंत्राचा थोडक्यात अर्थ असा की

ते त्याला(कबन्धी ला) म्हणाले प्रजा उत्पन्न करण्याची इच्छा झालेल्या प्रजापतीने तप केले. तपातून प्राण आणि रयि ही जोडी तयार झाली. ( ह्या मागचा उद्देश असा की)  हे जोडीने विविध प्रजांची निर्मिती करतील.

पद्म पुराणात उल्लेख केलेल्या 84 लक्ष योनी म्हणजे इतक्या प्रकारचे जीव, हा आकडा ज्याला आज जैवविविधता असे म्हटले जाते त्या आधुनिक आकडेवारीशी जुळणारा आहे.

**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**

.................................................

## वैदिक साहित्य आणि विज्ञान

**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**

**वैदिक साहित्य आणि विज्ञान**

प्रश्नोपनिषदातील पुढिल मंत्र आणखी आश्चर्यकारक आहे. आणखी एक वैज्ञानिक सत्य येथे आधीच सांगून ठेवले आहे.

**आदित्यो ह वै प्राणो रयिरेव चन्द्रमा रयिर्वा एतत् सर्वं, यन्मूर्तं च अमूर्तं च तस्मान्मूर्तिरेव रयिः ॥प्रश्नोपनिषद्। 1.5॥**

ह्या मंत्रात प्राण ला आदित्य म्हणजे सूर्यदेव असे संबोधले आहे. सूर्यापासून सर्व सजीवांना शक्ती मिळते तशीच ती चन्द्राला सुद्धा मिळते. चन्द्राला स्वतःचे तेज नाही. वीज आणि पवन शक्ती ह्या कोणत्यातरी माध्यमाशिवाय दाखवता येत नाही. श्रुतींना साकार आणि निराकार दोन्ही तत्वे मान्य आहेत. जसे अग्नी आणि वायू ह्यांच्या मध्ये सुद्धा उर्जा आहे. चंद्र ही मनाची शक्ती आहे. सूर्यशक्ती मुळेच हे जग चालले आहे ह्यात दुमत नाही. प्राण 3 प्रकारचे आहेत जसे विश्वाचा प्राण-वैश्वानर, आपल्या शरीरात असणारा जीवात्मा आणि आपण घेतो तो श्वास म्हणजे प्राणवायू. आपला श्वास, शरीराचे कार्य उर्जेशिवाय चालू शकत नाही. ह्या जगातील कोणतीच गोष्ट उर्जेशिवाय चालू शकत नाही. ऊर्जा आणि वस्तुमान ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत,असे आईनस्टाईन ने सिद्ध केले आहे. ऊर्जा (E) आणि वस्तुमान (m) या एकाच अस्तित्वाच्या दोन वेगवेगळ्या अवस्था आहेत आणि त्या एकमेकांमध्ये रूपांतरित होऊ शकतात. चंद्राच्या प्रभावामुळे अन्न तयार होते असा एक समज होता. सूर्यप्रकाशाने चंद्र प्रकाशमान भासतो. प्राण आणि रयि यांना अनुक्रमे सूर्य उर्जा आणि चंद्राचे जडतत्व असे म्हटले आहे. त्यामुळे उर्जा आणि वस्तुमान यांचे

सूर्य आणि चंद्र हे रूपक आहेत असे म्हणता येईल. म्हणूनच आईनस्टाईन चा सिद्धांत ऋषींनी आधीच मांडला आहे असेही म्हणता येईल.
ह्या मंत्रात ऋषी असे म्हणतात की
निश्चित पणे हा सूर्य म्हणजे प्राण आणि चंद्र म्हणजे पदार्थ. साकार आणि निराकार सर्व काही पदार्थ आहेत म्हणून साकार गोष्टी रयि आहेत.
सूर्याचा श्रीमद्भगवद्गीत केलेला उल्लेख इथे सांगण्याचा मोह आवरत नाहीये. ज्ञानी व्यक्तीला सूर्याची उपमा देऊन सूर्य स्वयंप्रकाशित आहे हे वैज्ञानिक सत्य महर्षी व्यासांनी सांगून ठेवले आहे.

**ज्ञानेन तु तदज्ञानं येशां नाशितमात्मनः |**
**तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ||**
**श्रीमद्भगवद्गीता 5.16||**

एक वेगळीच वाक्यरचना आपल्यासमोर ह्या श्लोकात मांडली आहे. 'अज्ञानम् ज्ञानेन नाशितम् ' म्हणजे ज्ञानामुळे अज्ञानाचा नाश होतो. अज्ञान नाशवंत आहे आणि अर्थातच ज्ञान शाश्वत आहे, सत्य आहे. सत्य एकच असते. असत्य कितीही असू शकतात.
दुसऱ्या वाक्यात 'ज्ञानम् प्रकाशयति' असे म्हटले आहे. मग येथे सहाजिकच प्रश्न पडतो, ज्ञान कर्ता आहे की कर्म?
ज्ञानाला आदित्यवत् म्हणजे सूर्याची उपमा दिली आहे. म्हणजे ज्ञान माणसाला स्वयंप्रकाशित बनवते. त्या काळात सूर्य, स्वयंप्रकाशित आहे हे माहीत होते हे सुद्धा विशेषच. आपल्या सर्वानाच माहित असलेला अभंग
'मागे पुढे दाटे ज्ञानाचा उजेड, उजेडी राहिले उजेड होऊन' असे कवींनी ज्ञानी व्यक्तीचे यथार्थ वर्णन केले आहे .
**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**
**.................................................**

## अचानक बाप्पा माझ्या घरी आला

**श्रीमती सुमति आठवले, ९४०४६ ०९३४८**

अधिकमासात (पुरूषोत्तम मास) महिलावर्गाचा कल पूजाअर्चा, धार्मिक आचरण नित्यनेमाकडे दिसतो. महिला मनात काही संकल्प करून आचरतात. उदाहरणार्थ गीतेच्या १५ वा अध्यायाचे पठण, भागवताचे श्रवण, जप करणे, नक्त ठेवणे वगैरे संकल्प करतात.  गीतेचा १५ वा अध्याय पुरूषोत्तम योग - ज्ञानोत्तर भक्तीचा कळस अध्याय असल्याने त्याचे मनन, पठण करण्याचा संकल्प केला. ह्यात फक्त २० श्लोक आहेत. माझ्या ध्यानी, मनी, स्वप्नी त्याचेच विचार, उत्सुकता, व प्रश्न येत होते. कालची गंमत सांगते तुम्हाला !!  स्वप्नात की प्रत्यक्षात आमच्या घरी भगवान श्रीकृष्ण अवतरले. मला काही सुचेना, कावरीबावरी झाले. त्यांना बसावयास काय आसन द्यावे हा विचार माझ्या मनात येत असताना, ते आपणहून हॉलमधील झोपाळ्यावर स्थानापन्न झाले. मी भरकन आत जाऊन गरम दूधात दूधमसाला घालून तो त्यांच्या हातात सुपूर्द केला. त्यांचे समोर बसण्यास सांगितले. त्यांना  नमस्कार करून समोर बसले.

ते सर्वज्ञानी असल्याने माझ्या मनातले अध्यात्माचे द्वंद्व  जाणून विषयालाच हात घातला. मी आत्ता १५ व्या अध्यायाचे निरूपण सांगतो. सुरवातीच्या श्लोकातील अश्वथवृक्षाच्या शब्दाची फोड करून मग सार सांगेन. गरमागरम दुधाचे चवीचवीने घोट घेत अर्थ सांगू लागले. संसारावर,अश्वथवृक्षाचे संदर रूपक असून वैराग्याचे शस्त्राने त्याचे छेदन करून परमपदाला पोहोचण्याचा सोपा उपाय आहे. अश्वथ वृक्षाचे मुळ वरती आणि फांद्या खाली असतात. ह्या शब्दाची फोड अशी =अ (म्हणजे

नाही) + श्व (म्हणजे उद्या) + थ (म्हणजे असलेला,टिकणारा) =आज जो आहे तो उद्या स्थित राहणार नाही तो अश्वथ वृक्ष होय. मानवी देह हा खोडासारखा आहे. हे सारे साधकाने जाणून घेतले पाहिजे. तमोगुणाच्या बीजाला अहंकाराची पालवी फुटते. केलेली कर्मे त्याला दिलेले पाणी आहे. रजोगुणाच्या फांद्या असतात. विषयाला इंद्रियांची तोंडे फुटलेली असल्याने त्याला विषयाचीच फळेफुले लागतात. मनुष्य त्यांचे सेवन इंद्रियांनी करून नाशाकडे जातो.

सूर्य, चंद्र, अग्नी यांतील तेज मीच आहे. सर्व भूताना मी धारण करतो. औषधी वनस्पतींना सोम होऊन पोसतो. वैश्र्वानर होऊन अन्न पचवितो. सर्वांच्या हृदयात अधिष्ठित असून स्मृति, ज्ञान, विस्मरण माझे पासूनच मिळतात. वेदकर्ता, वेदवक्ता मीच आहे.असे परमात्म्याचे दर्शन आहे. क्षर=नाशवंत भुते, अक्षर=प्रकृती आणि माया, ह्या दोहोतील श्रेष्ठ पुरूष म्हणजे पुरूषोत्तम म्हणजे मीच आहे. हे जो जाणतो तो बुध्दीमान व कृतकृत्य होतो. हा ह्या अध्यायाचा सारांश आहे. मी निरूपण ऐकण्यात गुंग होते. भगवंतानी आपले भाष्य संपवून दुधाचा रिकामा पेला माझ्या हाती दिला. मला शुभाशीर्वाद देऊन अंतर्धान पावले. मी स्वमग्नच होते. भानावर आल्यावर जे माझ्या स्मरणात राहीले ते तुम्हाप्रती सादर करत आहे. माझ्या लिखाणात काही चुका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मी जे जे जाणीले ते ते लिहीले आहे.

संदर्भ पुस्तके =1) सार्थ श्रीभगवद्गीता, 2) गीता रहस्य, 3) गीता सागर.

**श्रीमती सुमति आठवले, ९४०४६ ०९३४८**

.................................................

## वैदिक साहित्य आणि सामाजिक व्यवस्था

**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**

**वैदिक साहित्य आणि सामाजिक व्यवस्था**

आतापर्यंत आपण पंचमहाभूते आणि पर्यावरण ह्या बद्दल आपल्या वैदिक साहित्यात काय सांगितले आहे ते वाचले. आता आपण सामाजिक व्यवस्थेबाबत काय लिहिले आहे त्याचा आढावा घेऊ.

**चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः। तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम्।।श्रीमद्भगवद्गीता। 4.13।।**

मोठ्या गहन विषया वर श्रीभगवानकृष्ण ह्या श्लोकात भाष्य करत आहेत. आपल्या आजुबाजूला निसर्गात बारकाईने पाहिले असता एक गोष्ट स्पष्टपणे दिसून येते. वृक्ष, वनस्पती पशुपक्षी ह्यांना भगवंतांनी काही कामे वाटून दिली आहेत. वनस्पतींचा औषधी गुणधर्म तर आहेच. फुलझाडांना सुगंध पसरवण्याचे काम दिले आहे तर अळू, नोनी, कर्दळीची झाडे जमीनीतील अतिरिक्त क्षार शोषून घेतात आणि मातीचा समतोल राखतात. तीच गोष्ट प्राण्यांची. कावळे गिधाडे आणि डुक्करे स्वच्छतेचे काम करतात. आता तर फक्त मिथेन वायूवर वाढणारे जिवाणू सुदधा सापडले आहेत.

निसर्गाचा समतोल राखण्याची हि व्यवस्था भगवंतांनीच निर्माण केली आहे. पर्यावरणीय अन्न साखळीत सर्वांना काही जबाबदारी दिली आहे. अशीच व्यवस्था त्यांनी चातुर्वर्णाच्या रूपात माणसांसाठी केली आहे असे म्हटले तर काहीच चूक नाही.ज्याने जसे काम करणे अपेक्षित होते तशीच त्याच्याकडे कौशल्ये सुदधा निर्माण

झाली. सुदैवाने प्राणी आणि वनस्पतींच्या जगात त्यांच्या कामावरून जेष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच असे काही नसते.

माणसांनी मात्र ते करत असणारे काम आणि कातडीचा रंग ह्याचा विपर्यास केला. माणसामध्ये असणारे गुण आणि कर्माच्या प्रतवारी नुसार चातुर्वर्णाची निर्मिती झाली. चातुर्वर्णाचा संबंध त्रिगुणांशी आहे, जन्माशी नाही हे आवर्जुन सांगितले आहे. पुढे श्रीभगवानकृष्ण असे म्हणतात की ह्या सृष्टिचा रचयिता तेच, पण तरीही ते अकर्ता आहेत. हयाचा अर्थ कसा लावायचा? ह्याचे दोन पर्याय समोर येतात. जसे आपण म्हणतो मी बस मध्ये बसले आणि दुसऱ्या गावी पोहोचले (मला बसचालकाने एका ठिकाणाहून दुसरीकडे पोहोचवले.). तसेच श्रीभगवानकृष्ण सृष्टी-कर्ता आहेत तरीही अकर्ता आहेत. दुसरे म्हणजे ते कर्ता असले तरी कर्मबंधनात अडकलेले नाहीत म्हणून ते अकर्ता आहेत.

ह्या श्लोकाचा थोडक्यात अर्थ असा की

गुण आणि कर्माच्या वर्गीकरणानुसार माझ्याकडून चार वर्णाची निर्मिती झाली आहे. त्याचा कर्ता मी असलो तरी मी अकर्ता आणि अपरिवर्तनीय आहे हे तू समजून घे.

श्रीमद्भगवद्गीतेच्या 18 व्या अध्यायातील 41-44 ह्या श्लोकात चातुर्वर्णाबद्दल महर्षी व्यासांनी विस्ताराने वर्णन केले आहे. त्यापैकी 44 वा श्लोकाचा आढावा आपण घेऊया.

**कृषिगौरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम्। परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम्।।श्रीमद्भगवद्गीता 18.44।।**

अतिशय शांतपणे हा श्लोक आपण वाचूया. ह्या श्लोकात वैश्य आणि शूद्र व्यक्तिंच्या कर्माचे वर्णन केले आहे.

ते वाचले की असे वाटते की आपल्या समाजाचा डोलारा ह्यांच्या जीवावर तर उभारला गेला आहे.

वैश्य-कर्मींसाठी कृषी, गोपालन आणि व्यापार असे महत्वपूर्ण व्यवसाय सांगितले आहेत.

आणि शूद्र कर्मींचे वर्णन सेवाकर्मी असे केले आहे.

42, 43 आणि 44 व्या श्लोकांचा एकत्रित विचार करता ब्राह्मण हे ज्ञानी असतात असे म्हटले तर त्या काळातील समाजाची धोरणात्मक व्यवस्था ते पहात असावेत तर क्षत्रिय सुरक्षेची जबाबदारी घेत होते. कृषी म्हणजे अन्नाचे उत्पादन, गोपालन (गोधन निर्माण करणे) आणि व्यापार, ह्यामधे राजाला अर्थसहाय्य करणे हे सुद्धा आलेच. अशी अर्थव्यवस्था सांभाळण्याचे महत्त्वाचे काम वैश्य करत होते. आता उरलेली कामे शूद्र करीत होते म्हणजे नक्की कोणती कामे? ह्याचा विचार करावयास हवा.

ह्या श्लोकात परीचर्या म्हणजे सेवा करणे असा शब्द वापरला आहे. म्हणजे आजच्या काळाप्रमाणे 'सेवा उद्योग.' शेतीसाठी अवजारे बनवणे, शस्त्रे तयार करणे, जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन, घरबांधणी वगैरे. (बारा बलुतेदार) याचाच अर्थ, अशी मूलभूत सुविधा पुरवली जाणारी कामे शूद्रांची असावीत. सर्व प्रकारच्या कारागीरांचा ह्यात समावेश होऊ शकतो.

शूद्र म्हणजे ब्रह्माचे पाय, ऋग्वेदातील पुरुषसूक्तात व संत श्रीएकनाथांनीही परमेश्वराच्या मुखापासून ब्राह्मण, बाहूंपासून क्षत्रिय, मांड्यांपासून वैश्य आणि पायांपासून शूद्र निर्माण झाले, असे म्हटले आहे. निरनिराळ्या वेदांत निरनिराळी वर्णने आहेत) हे प्रतिकात्मक मानले तर शूद्रांनी निर्माण केलेल्या पायावर सर्व सामाजिक व्यवस्था उभी राहिली होती असे म्हणता येईल.

येथे पराशर ऋषींचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. त्यांनी रचलेला कृषीविषयक ग्रंथ 'कृषि पराशर', कृषी विषयक संशोधन शेतात कष्ट करणाऱ्यां शिवाय शक्य झाले असते का? म्हणजे ज्ञानी व्यक्तिने संशोधन करायचे, शूद्रांनी त्यासाठी आवश्यक सेवा द्यायची आणि वैश्यांनी ते संशोधन राबवायचे, अशी साधारण व्यवस्था असावी.

श्रीमद्भागवतम् मधील खालील श्लोकातून समाज व्यवस्थेची स्पष्ट कल्पना समजते.

**यस्य यल्लक्षणं प्रोक्तं पुंसो वर्णाभिव्यञ्जकम्। यदन्यत्रापि दृश्येत तत्तेनैव विनिर्दिशेत् ॥ श्रीमद्भागवतम् 7.11.35 ॥**

जर कोण्या व्यक्तीमध्ये काही (तो जसा ओळखला जातो त्यापेक्षा) वेगळ्या प्रकारचे गुण दिसून आले तर त्याला त्या गुणांनुसार ओळखले गेले पाहिजे.

ह्या श्लोकाचा थोडक्यात अर्थ असा की

कृषि, गौपालन आणि व्यापार हे वैश्याचे स्वाभाविक कर्म आहेत, शूद्रांचे स्वाभाविक कर्म आहेत परिचर्या म्हणजे सेवा करणे.

त्या पुढील श्लोकात म्हणजे 18.45 व्या श्लोकात श्रीभगवानकृष्ण म्हणतात आपापले स्वाभाविक कर्म तत्परतेने करून माणूस त्यात विशेष सफलता प्राप्त करू शकतो. स्वतःचे कर्म आत्मियतेने करून मनुष्य सिद्धी कशी प्राप्त करून घेतो ते तू माझ्याकडून ऐक.

त्यापुढील श्लोकात म्हणजे 18.46 व्या श्लोकात श्रीभगवानकृष्ण असे म्हणतात की ज्याच्यामुळे सर्व जीवांची उत्पत्ती झाली आहे आणि ज्याने हे सर्व विश्व व्यापून टाकले आहे, त्याची स्वकर्माने पूजा करून मनुष्य सिद्धि प्राप्त करतो.

आपल्याला नेमून दिलेले काम आपण प्रामाणिकपणे केले असता त्याला सिद्धी प्राप्त होणार आहे. किती स्पष्टता आहे महर्षी व्यासांच्या विचारात. भेदभाव, सापत्नभाव असे काही मुद्देच नाहीयेत. आपल्याच कर्मदरिद्रीपणाने आपण अशी विचित्र परिस्थिती निर्माण केली आहे. ह्याला दुजोरा देणारा आणखी एक श्लोक.

**विद्याविनयसम्पने ब्राह्मणे गवि हस्तिनि | शुनि चैव श्वपाके च पण्डिता: समदर्शिन: ||श्रीमद्भगवद्गीता 5.18||**

ह्या श्लोकात ज्ञानी पुरुष ओळखायचा कसा त्याचे वर्णन केले आहे, गाय हत्ती कुत्रा आणि कुत्रा खाणारे यांची उदाहरणे देऊन. मागील श्लोकात ज्ञानी पुरुषाचे वर्णन आदित्यवत् म्हणजे सूर्यासारखा स्वयंप्रकाशित असे म्हटले होते, येथे सूर्याच्या दुसऱ्या गुणाची उपमा ज्ञानी पुरुषाला दिली आहे. कवी भा. रा. तांबे यांची अर्थपूर्ण कविता 'मावळत्या दिनकरा समदर्शी तू खरा'.

पुढे येणाऱ्या 6व्या अध्यायातील 29 आणि 32 व्या श्लोकात सुद्धा समदर्शी असण्याचे दाखले दिले आहेत. येथे ज्ञानी विदयमान तर आहेच, तो विनयशील आहे, सर्वांकडे एकाच दृष्टीने पाहतो. गाय सत्वगुणी, हत्ती रजोगुणी आणि कुत्रा तमोगुणी तर श्वपाक विद्याहीन असे मानले तर अशा सर्वांकडे ज्ञानी पुरुष एकाच नजरेने पाहतो. मनात कोणताच भेदभाव नाही. असे चित्र सामूहिक धार्मिक कार्यक्रमात पाहता येते. जसे पंढरपूरला जाणारी वारी, सर्वांच्या मनात फक्त विठ्ठलाचे चिंतन असते. सर्वच एकमेकांकडे विठ्ठल भावनेने पहात असतात.

हया श्लोकात श्रीभगवानकृष्ण अर्जुनाला असे म्हणतात की

विद्ये ने चित्तवृत्ती शांत आणि मर्यादशील झालेल्या ब्रहमवेत्त्याकडे, गाय, हत्ती, कुत्रा तसेच चांडाळ यासर्वाकडे विद्वान सारख्याच दृष्टीने पाहतात.

**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**

....................................................

## आवाहन

**आपल्या सर्वांना आग्रहाची विनंति की संस्थेचे देणगीदार, हितचिंतक / वर्गणीदार व्हा. त्यासाठी**

वर्गणीदार/हितचिंतकास वार्षिक वर्गणी रु ५०० अथवा आजीव वर्गणीदार होण्यासाठी ची वर्गणी रु ७०००.

संस्थेच्या बॅंकेतील खात्याची माहिती HDFC Bank Ltd, F.C. Road branch, Pune, Current Account Number 50200056690683, IFSC Code HDFC0001115 ह्या खात्यात चेक/डीडी/रोख अथवा UPI / NEFT द्वारे पैसे भरून आपली माहिती गुगल अर्जाद्वारे पाठवावी. त्यासाठी लिंक खालीलप्रमाणे आहे https://forms.gle/8xcrm1MkFY28XrsJ6 हा अर्ज आपल्याला सेलफोनवरून अथवा संगणकावरून भरता येईल.
सर्व आठवले परिवारांना विनम्र आवाहन करण्यात येते की आपण ठरविलेली उद्दिष्ट्ये आपल्या सर्वांच्या सक्रिय सहभागाशिवाय व आर्थिक पाठबळाशिवाय साध्य होऊ शकणार नाहीत म्हणून आपल्या आठवले परिवाराच्या सर्वांगीण उन्नतीसाठी मोठ्या संख्येने देणगीदार आणि वर्गणीदार / हितचिंतक व्हावे व संस्थेला आर्थिक पाठबळ द्यावे.

....................................................

## वैदिक साहित्यातील ज्ञानाचे महत्त्व

**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**

**वैदिक साहित्यातील ज्ञानाचे महत्त्व**

आपल्या रोजच्या जगण्यात जर ज्ञानाची कमी असेल तर आपले प्रचंड नुकसान होत असते. त्याचाच एक महत्वाचा भाग म्हणजे अंधश्रद्धा. बरेचदा अनेक गोष्टी आपण केवळ प्रथा म्हणून करत राहतो. अंधश्रद्धा आणि त्यामुळे आतापर्यंत गरीब निष्पाप लोकांचा विशेषतः स्त्रीयांचा झालेला मानसिक छळ आपण सर्व जाणतो. श्रीमद्भगवद्गीतेत श्रीभगवानकृष्णांनी 2 रया अध्यायातील शेवटच्या श्लोकात कर्मयोगा पेक्षा ज्ञानयोग श्रेष्ठ असे स्पष्ट सांगितले आहे. श्रीमद्भगवद्गीता हा फक्त आपला धर्मग्रंथ नाही तर जीवनकौशल्ये शिकवणारा मार्गदर्शक सुद्धा आहे. श्रीमद्भगवद्गीतेचा १२ वा अध्याय म्हणजे भक्ती योग , त्यामध्ये सुद्धा आपली भक्ती डोळस असावी असेच म्हटले आहे. आधुनिक काळातील लोकांच्या मनात शिक्षण खुले झाल्यामुळे कर्मकांड हे थोतांड आहे असे वाटू लागते. आपला धर्म पाळावा की नाही असे द्वंद्व कायम आपल्या मनात चालू असते. ह्या सर्वांचे उत्तर महर्षी व्यासांनी आधीच देऊन ठेवले आहे. त्यासाठी 2 रया अध्यायातील 42, 43 आणि 44 व्या श्लोकात अतिशय स्पष्ट विवेचन केले आहे. कदाचित हा प्रश्न त्या काळात सुद्धा निर्माण झाला असावा. सध्याच्या काळात संस्कृत चा उपयोग मुख्यत्वे कर्मकांड करण्यासाठीच केला जातो.पण हे 3 श्लोक वाचले की त्या काळातही वेदांचे स्तोम माजवले जात होते का, वेदांत सांगितलेल्या कर्मकांडांना अनाठायी महत्त्व प्राप्त झाले होते का? असे प्रश्न मनात येतात.
जसे वेदांमधील कर्मकांड विभागात सांगितल्याप्रमाणे

**अपाम सोममृता अभूम आणि अक्षय्यं हे वै चातुर्मास्ययाजिनः सुकृतं भवति।।**

जे चातुर्मासाचे पालन करतात ते अमर आणि सदैव आनंदी होण्यासाठी सोमपरसपान करण्यास पात्र ठरतात.
आता ह्या विधानाला कोणीतरी त्याला धरबंध घालणे आवश्यक होते, ते काम महर्षी व्यासांनी केले आहे असे वाटते.

**यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्यविपश्चितः। वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः।।श्रीमद्भगवद्गीता 2.42।।
कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम्। क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति।।श्रीमद्भगवद्गीता 2.43।।**

ह्या दोन श्लोकांचा अर्थ असा की हे पार्थ! हे असे चांगला जन्म आणि कर्म मिळवून देणारे, भोग आणि ऐश्वर्यप्राप्तीची निरनिराळी वर्णन करणारे अतिशयोक्तीपूर्ण वचने निरनिराळ्या आशाआकांक्षा आणि स्वर्गसुखाच्या प्राप्ती शिवाय इतर काहीच श्रेष्ठ नाही अशी वेदांतील वचने खरे मानणारे, अविवेकी असतात.

**भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम्। व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते।। श्रीमद्भगवद्गीता 2.44।।**

ह्या श्लोकात श्री भगवान कृष्ण असे म्हणतात की अशा (भ्रमित वचनांमुळे) बुद्धिभेद करणाऱ्या उपभोगशील आणि भौतिक सुखाच्या आधीन झालेल्या व्यक्तीकडे दृढ निश्चय आणि स्थिर बुद्धी नसते.

**अविद्यायामन्तरे वर्तमानाः स्वयंधीराः पण्डितं मन्यमानाः। जङ्घन्यमानाः परियन्ति मूढा अन्धेनैव नीयमाना यथान्धाः ।।मुण्डकोपनिषद्-1.2.8 ।।**

"जे स्वर्गलोकाचे सुख मिळवण्याच्या हेतूने वेदांत वर्णन केलेल्या अवडम्बरपूर्ण कर्मकाण्डांत व्यस्त राहतात आणि स्वतःला धार्मिक ग्रंथपंडित समजतात ते वास्तविक मूर्ख आहेत, ते सर्व एका अंध व्यक्तिने दूसर्या अंध व्यक्ति ला रस्ता दाखविण्यासारखे आहे".

**मूढग्राहेणात्मनो यत्पीडया क्रियते तपः । परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम् ॥ श्रीमद्भगवद्गीता ॥ 17.19॥**

17 व्या अध्यायातील 5व्या आणि 6व्या श्लोकात तामसी वृत्तीच्या व्यक्तींचे वर्णन केले आहे. 13 व्या श्लोकात तामसी यज्ञ म्हणजे काय ते सांगितले आहे. एखाद्या व्यक्तीला मूर्ख म्हणणे तसे जोखमीचे काम, कारण एखादे वेड डोक्यात घेऊन त्यावर झपाटलेपणाने काम करून स्वतःला सिद्ध करणारे बरेच असतात. पण ते स्वतःला सिद्ध करतात. सरतेशेवटी त्यांचे काम लोकांच्या उपयोगी पडणारे ठरते. पण तामसी लोकांच्या मनातील हेतू हा नेहमीच दुसऱ्यांना त्रास देणे हा असतो. म्हणून ह्या श्लोकात मूढ-ग्राहेण असा शब्द वापरला आहे आणि तामसिक तपा बद्दल विवेचन दिले आहे.

ह्या श्लोकात श्रीभगवानकृष्ण असे म्हणतात की जे तप हटवादीपणाने, स्वतः ला कष्ट देऊन किंवा दुसऱ्यांना त्रास देण्यासाठी केले जाते त्याला तामसी तप म्हटले जाते.
आतापर्यंत, कर्मकांडे करणे फार काही महत्वाचे नाही हे आता आपल्याला समजले. मग काही जणांना वाटेल की केवळ नमस्कार केला की पुरे झाले. तर ते तसे सुद्धा नाही. तो सुद्धा एक वरवरचा दिखावाच. 12 व्या अध्यायात श्रीभगवानकृष्णांनी त्यांना प्रिय

असणाऱ्या भक्ताचे वर्णन केले आहे. बघू या ते काय म्हणतात ते.

**अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च।**
**निर्ममो निरहङ्कारः समदुःखसुखः क्षमी।।**
**श्रीमद्भगवद्गीता 12.13।।**

**सन्तुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः।**
**मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः।।**
**श्रीमद्भगवद्गीता 12.14।।**

परमेश्वराशी जोडून घेण्याच्या प्रक्रियेत सामान्य माणसाच्या वागण्याबोलण्यात काय काय बदल होत असतात म्हणजेच योगी होण्याच्या प्रक्रियेचे वर्णन ह्या दोन श्लोकात केले आहे. हि सर्व गुणवैशिष्ट्ये भक्तीयोगाच्या अनुषंगाने सांगितली आहेत. 13 व्या श्लोकात साधकाचे दुसऱ्याप्रती वर्तन कसे असावे ह्याचे वर्णन, त्याच बरोबर स्वतः मधे होणारे बदल ह्याचे वर्णन केले आहे.

एकेक गुणाचा जर मानसशास्त्राच्या दृष्टीकोनातून पहायचे ठरवले तर एक गुणसंपन्न व्यक्ती होण्याची प्रक्रियाच समोर येईल. सर्वात पहिला गुणविशेष म्हणजे सर्व जीवांचा कधीही **द्वेष न करणे**. आपल्या मनात दुसऱ्याबददल तेव्हाच द्वेष उत्पन्न होतो जेव्हा आपल्याला स्वतः बद्दल खात्री नसते. किंवा आपल्या अवाजवी अपेक्षांची पूर्तता होणे शक्य नसते. दुसऱ्या बाजूने सांगायचे झाले तर ज्याला स्वतःच्या कार्यक्षमतेबद्दल आत्मविश्वास असतो त्याच्या मनात दुसऱ्या बद्दल द्वेषभाव असण्याचे कारण नाही. असेच लोक सर्वांशी मैत्री करू शकतात. ते दुसऱ्यांना मदत करायला कायम तत्पर असतात. त्यांच्या मनात दुसऱ्याबददल करूणा असते.

आता पुढचा शब्द **निर्मम** म्हणजे ममतारहीत, थोडा बुचकळ्यात टाकणारा आहे. इथे स्वतःबद्दल ममतारहीत असणे अपेक्षित आहे. ज्याचे फक्त स्वतःवर प्रेम असते तो दुसऱ्याच्या भल्याचा विचार करूच शकत नाही.

तीच गोष्ट **अहंकाराची**. अहंकार तर दोन माणसांमधील सुसंवाद घडू न देणारा सर्वात मोठा अडथळा. इथे ममतारहीत म्हणजे स्वतःच्या शरीरावर, सौंदर्यावर प्रेम नसणारा असाही घेता येईल कारण अहंकार हा मन आणि बुद्धी शी निगडित आहे. अशा अहंकार आणि ममता विरहित साधकासाठी सुख आणि दुःख दोन्ही सारखेच. त्यानंतर चा सर्वात मोठा गुण म्हणजे **क्षमाशीलता**. विरोध करण्याची क्षमता नसताना गप्प बसून सहन करणे वेगळे आणि दुसऱ्याच्या चुका, त्यांच्या कडून झालेले अपराध आणि अपमान, माफ करणे वेगळे. ज्याच्या मनात दुसऱ्याबददल करूणा आहे तोच असे करू शकतो.

**संतुष्टी** म्हणजे समाधान. स्वतःवर फाजील प्रेम नाही पण आत्मसंतुष्टी आहे अशी व्यक्तीच सर्व जगाचा व्यापक विचार करू शकते. त्यापुढे जाऊन भगवंतांनी **आत्मनियंत्रित** आणि **दृढनिश्चयी** म्हटले आहे. आता भक्तीयोगाचा व्यापक अर्थ लक्षात येतो. भक्ती म्हणजे केवळ भजन किर्तन असा मर्यादित अर्थ नसून इतके सर्व गुणविशेष अंगिकारल्यानंतर मनाने आणि बुद्धीने स्वतःला परमेश्वराच्या ठायी समर्पित करायचे..

ह्या दोन श्लोकाचा आता थोडक्यात अर्थ असा की जो साधक द्वेष, ममता अहंकार विरहित आहे, ज्याच्या मनात सर्व जीवांबददल करूणा, मैत्री आहे, जो सुखदुःखांकडे सम दृष्टिने पाहतो, जो संतुष्ट, आत्मनियंत्रित, दृढनिश्चयी असून

मनाने आणि बुद्धीने मला समर्पित आहे असा योगी मला प्रिय आहे.
कर्मकांडांचा विषय निघालाच आहे तर त्या अनुषंगाने पुढे सांगते. आजकाल महापूजा,महाआरती, महाप्रसाद , महा अभिषेक यांचे स्तोम माजले आहे. जितका खर्च आणि डामडौल जास्त तेवढी भक्ती जास्त असे आता लोकांना वाटू लागले आहे. ह्याबाबत श्रीमद्भगवद्गीतेत काय सांगितले आहे ते आपण वाचू.

**पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति।**
**तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः।।**
**श्रीमद्भगवद्गीता 9.26।।**

आपल्याला शबरीची उष्ट्या बोरांची गोष्ट माहीत आहेच. शिवाय विदुराच्या पत्नीने अनावधानाने कृष्णाला दिलेल्या केळ्याच्या सालीची सुद्धा गोष्ट माहीत आहे. सुदामा चे पोहे श्रीभगवानकृष्णांनी अतीव प्रेमाने चाखले होते. आधुनिक काळात पर्यावरणाच्या संरक्षणाच्या दृष्टीने एक मुद्दा सांगावासा वाटतो. सर्व सृष्टी परमेश्वराने निर्माण केली असल्याने, त्यानेच निर्माण केलेल्या फुले आणि फळांमधे त्याच्या मनात दुजाभाव असण्याचे कारण नाही.

आपण मात्र व्यापारीकरणाच्या नादात काही विशिष्ट धान्य, फळे यांना विशेष महत्त्व देतो. जसे हापूस आंबा सर्वश्रेष्ठ आणि म्हणून सर्वात महाग सुद्धा. सर्व शेतकरी सुद्धा मग लोकप्रिय वाणांचीच लागवड जास्त करतात. पर्यायाने निसर्गाचा समतोल बिघडतो.आंब्याच्या सर्व जातींना समभाव द्यायला हवा. येथे श्रीभगवानकृष्ण स्वतः च सांगत आहेत की परमेश्वराला साधीसुधी अगदी कोणतीही गोष्ट दिलेली चालते. फक्त मनात सच्चा भाव असावा. बाह्य अवडंबर नको.

**नाहं वेदैर्न तपसा न दानेन न चेज्यया। शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा।।**
**श्रीमद्भगवद्गीता 11.53।।**

माझे चतुर्भुजरूप जे तू पाहिले आहेस ते वेदपठण, तप, दान किंवा यज्ञ करून पाहता येत नाही. (मनात भक्ती आणि प्रेम असायला हवे) म्हणजेच वेदाभ्यास, तप, दान, यज्ञ ही सर्व साधने आहेत परमेश्वराच्या जवळ पोहोचण्यासाठी, परमेश्वर नव्हे.

ह्या सर्वाचा लक्षणार्थ हाच की आपण काय अर्पण करतो ते महत्वाचे नाही तर त्यामागचे भाव शुद्ध असायला हवे. ह्या श्लोकात श्रीभगवानकृष्ण असे म्हणतात की जो कोणी मला भक्तिभावाने पान फुल फळ पाणी अर्पण करतो. अशा शुद्ध मनाने भक्तीपूर्वक दिलेल्या उपहारांचा मी स्वीकार करतो.

**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**

..................................................



**श्रीरंग आठवले**

## स्पंदनं, ऊर्जा शक्ती आणि अद्वैत - भाग २

**प्रसन्न आठवले, 9049353809**

विज्ञानानुसार ऊर्जा, प्रकाश, ध्वनी हे सूक्ष्म आणि प्रवाही आहेत. कारण या तिन्ही मधून लहरी, स्पंदनं आणि नाद /vibrations बाहेर पडतो.

शास्त्रानुसार आत्मा सुद्धा निर्गुण निराकार पण प्रवाही, स्वप्रकाशित, तेजोमय, ज्योतिस्वरूप, आणि नाद स्वरूपात असतो. देहाबाहेर असताना तो ज्ञानस्वरूप, ज्योतिर्मय, आनंदमय असतो. मुळात अनेक प्रकारांनी याचं वर्णन आपल्या शास्त्रात केलेलं आहे. तो संपूर्ण जगतात, नव्हे ब्रम्हांडात व्यापलेला आहे.

देहातील आणि देहाबाहेरील असा भिन्नपणा आत्म्यात नाही. वास्तविक संपूर्ण ब्रम्हांडात त्याचं अस्तित्व आहे. आपल्याला ते कळत नाही. कारण आपण अशा ठिकाणी, अश्या स्थितीत आहोत की, आपल्याला स्थूल देहामुळे, सर्व सत्य दिसतं, ते वास्तविक विपरीत आहे.

तसा फरक आपल्याला सूक्ष्मदेह (मन, बुद्धी, चित्त, अहंकार) व स्थूल देह, अर्थात शरीराच्या असण्याने वाटतो. देहातील आत्मा हा वैश्विक शक्तीचा अंश आहे. मुळात सूक्ष्मदेह हा ब्रह्म व माया, यांच्या एकत्र येण्याने निर्माण होतो. मायेच्या निर्मितीने ब्रह्मातील अप्रकट चैतन्य प्रेरित होऊन, त्यातून एक कण निर्माण झाला. त्या एका कणातून, ब्रह्माची अप्रकट शक्ती आणि मायेची शक्ती यातून मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार या सूक्ष्म देहाच्या अवस्था निर्माण झाल्या.

पुनरावर्तन हा मायेचा गुण झाला. ही त्रिगुणात्मक माया, नियंत्याने प्रकृती आणि पुरुष यांचा आभास निर्माण करून ब्रम्हाच्या निर्मितीनंतर ब्रह्मासमोर प्रकट केली. हाच वास्तविक नियंत्याचा संकल्प होता. कारण ब्रम्ह हे शुद्ध, स्थिर, एकच आणि अविकारी आहे. आणि जिथे विकार नाहीत तिथे निर्मितीला काहीही वाव नाही. म्हणून मायेच्या समोर येण्याने, ब्रह्मातील अप्रकट तत्व, गुणात्मक स्वरूपात आणि गुणाकार करून प्रकट झालं.

तेच हे पूर्ण विश्व. म्हणजे आता हा सर्व ब्रह्मांडाचा खेळ आपण इथून बघतो म्हणून आपल्याला सत्यमय, अस्तित्वमय दिसतं. पण ब्रम्हाच्या स्थानी हे सर्व भासमय दिसतं. म्हणूनच आदी शंकराचार्य म्हणतात की ब्रम्ह सत्य जगत मिथ्या. याचं अजून एक कारण म्हणजे हे जगत सतत क्षणक्षण परिवर्तित आहे. किंबहुना तोच प्रकृतीचा नियम आहे. त्यामुळे बदलणारी कोणतीही गोष्ट ही पूर्ण सत्य असू शकत नाही. मायेच्या त्रिगुण संयोगामुळे शुद्ध सुद्धा म्हणता येणार नाही. म्हणूनच अब्रह्म म्हणता येईल.

आता या प्रकटरूप सूक्ष्म कणातून पुढे अखिल ब्रम्हांडातील चराचराची निर्मिती झाली. कारण ब्रम्ह माया संयोगाने त्याला पुनर्निर्मिती तत्व प्राप्त झालं. त्यासाठी आवश्यक शक्तीत्व, ऊर्जतत्व त्यात प्रकट झालं होतं. ते सर्व अप्रकट ब्रम्हाचा भाग होतं. पण मायेने त्याला प्रकटत्व मिळालं. त्या एका कणातून पूर्ण विश्वनिर्मिती झाली. त्यातूनच सूक्ष्म देहाची निर्मिती झाली.

अशा प्रकारे निर्माण झालेल्या सूक्ष्म देहाला, इच्छा व मोह झाला. त्यातून स्वनिर्मिती, स्वानुभव आणि प्रकटीकरण करण्याची इच्छा निर्माण झाली. त्यावेळी तो देहात येण्याचा विचार करून, कार्यरत झाला.

देहप्राप्तीसाठी सूक्ष्म देह योग्य वातावरण अर्थात स्थूल देह शोधतो. कारण निर्माण झालेल्या इच्छा व वासना, त्या सूक्ष्मदेहाला कार्यरत करतात किंवा प्रवाही करतात आणि स्थूल देहाशिवाय त्या शांत होत नाहीत.

पण ही चक्रीय प्रक्रिया आहे. म्हणजे एक पूर्ण होण्याआधी दुसरी इच्छा तयार असते. सूक्ष्मदेहातील मन, बुद्धी, चित्त व अहंकार हे महतत्व मायेपासून उदयास येतात. त्यातून इच्छेची निर्मिती होते. जे प्रथम कर्म म्हणता येईल.

त्यानंतर त्यांना स्वनिर्मितीची चेतना मिळते. तिथे ज्ञानेंद्रिय आणि कर्मेंद्रिय यांच्या प्रकटीकरणाची प्रेरणा मिळते. या प्रेरणेतून सूक्ष्मदेह आपल्या मनात प्रकट होणाऱ्या इच्छेच्या पूर्ततेसाठी योग्य स्थळाची निर्मिती करण्याच्या मागे लागतो. अर्थातच स्थूल देह म्हणजे पंचमहाभूत रूप देह, हे एकच ते योग्य ठिकाण आहे, जिथे सूक्ष्मदेहात प्रकट झालेल्या, होणाऱ्या व होऊ घातलेल्या इच्छा, वासना, यांच्या पूर्ततेसाठी आवश्यक इंद्रिये, अवयव आणि इच्छिलेले प्रत्यक्षात आणण्याची क्षमता असते.

स्थूल देहाशिवाय, सूक्ष्मदेह हां निरुपयोगी असतो. अर्थात काष्ठाशिवाय असलेला अग्नी. याच प्रवासात व प्रवाहात, सूक्ष्मदेहात प्रकट झालेल्या कर्मांच्या पूर्ततेसाठी, आवश्यक देह शोधण्याचे कार्य सूक्ष्म देहाला अविरत कार्यरत ठेवते. अशी योग्य ती देह प्राप्तीची वेळ प्रकृती आणि पुरुष यांच्या संयोगातून मिळते. तिथे देहातील अंकुर तयार होतो. त्या ठिकाणी प्रथम आत्म्याचा कायाप्रवेश होतो. वास्तविक हा आत्मा अव्याहत संचारित आहे. किंबहुना तो विश्वाच्या वातावरणाचा भाग आहे.

परंतु ज्याप्रमाणे एखाद्या भरलेल्या बादलीत एखादा रिकामा जग किंवा ग्लास बुडवला की, बादलीत असलेलं पाणी ग्लासात किंवा जगात आपोआप भरलं जातं.

म्हणूनच देहांकूर अर्थात बीज निर्माण होताच, तिथे आत्म्याचा प्रवेश होणे क्रमप्राप्त आहे. जीवाच्या निर्मिती प्रक्रियेत आत्म्याचं अस्तित्व अनिवार्य आहे. पण ते विशिष्ट कालमर्यादित आपलं कार्य करून, पुन्हा त्या स्थूल देहातून ब्रम्हांडात स्थिरावतं. अर्थात ते चैतन्य आहे आणि त्याची ऊर्जा शक्ती सूक्ष्म देहाला, स्थूल देहातून पुढील कार्य करून घेण्यासाठी अनिवार्य आहे.
आज इथेच थांबूया. पुढच्या भागात पुढे जाऊ.

**संकल्पना संकलन आणि लेखन: प्रसन्न आठवले**
**9049353809, 9960762179**

.................................................



# वैदिक साहित्य आणि मानस शास्त्र

**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**

**वैदिक साहित्य आणि मानस शास्त्र**
आपले आयुष्य निरनिराळ्या आश्चर्यांनी आणि चमत्कारांनी भरलेले आहे. हे अगदी राजा धर्माराजांना सुद्धा मान्य आहे.

**अहन्यहनि भूतानि गच्छन्तीह यमालयम्।**
**शेषाः स्थिरत्वम् इच्छन्ति किमाश्चर्यमतः परम् ।। (महाभारत)**

"क्षणोक्षणी लोक मृत्युमुखी पडतात आणि बाकीचे हे पहात असतात. ते सुद्धा एक दिवस मृत्यू पावणार आहेत हे मात्र त्यांच्या ध्यानात येत नाही. ह्या पेक्षा आश्चर्यजनक अजून काय असेल?
प्रश्न असा आहे की अशी सर्व आव्हाने आपण पेलायची कशी? आपले मन शांत ठेवून योग्य निर्णयक्षमता असणे हि आपल्या आयुष्यातील मोठी देणगीच. निरनिराळे कठीण प्रसंग येत राहणार आणि आपल्याला त्या सर्वांना तोंड देऊन पुढे जाचे आहे, ते कसे साधायचे हे सर्व महर्षी व्यासांनी गीतेत सांगून ठेवले आहे. उदाहरणादाखल काही श्लोक पाहूयात.

**श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला।**
**समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि।।**
**श्रीमद्भगवद्गीता 2.53।।**

मन विचलित झालेले असेल तर कोणतेच काम नीट करता येणार नाही. अर्जुनाला युद्ध करण्यापूर्वी आपले मन शांत, अविचल ठेवणे फारच गरजेचे आहे. आपल्यासाठी सुद्धा हा एक चांगला उपदेश आहे. अटीतटीच्या प्रसंगी आपले मन स्थिर असले पाहिजे. समत्व भावा बद्दल आपण आतापर्यंत मागच्या काही श्लोकात वाचले. येथे **समाधौ अचला** असे म्हटले आहे म्हणजे समत्व भावाने स्थिर असलेली बुद्धी. बुद्धिची स्थिरावस्था.
ह्या श्लोकात श्रीभगवानकृष्ण असे म्हणतात की निरनिराळ्या गोष्टी ऐकून विचलित झालेल्या तुझ्या बुद्धीला जेव्हा अचल स्थिरावस्था येईल तेंव्हा तुला योग अवस्था प्राप्त होईल.

**प्रजहाति यदा कामान् सर्वान् पार्थ मनोगतान्।आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते।। श्रीमद्भगवद्गीता ॥ 2.55।।**

हा श्लोक वाचल्यावर तुकारामांच्या अभंगाची आठवण होते, "ठेविले अनंते तैसेचि रहावे | चित्ती असू द्यावे समाधान ||'
ह्या श्लोकात मनोगतान् कामान् असे म्हटले आहे. म्हणजे मनामध्ये निर्माण होणाऱ्या निरनिराळ्या आशाआकांक्षा आणि त्यातून निर्माण होणाऱ्या विवंचना मतभेद संघर्ष नैराश्य तसेच आनंदी भावना सुद्धा.

**यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि श्रिताः।**
**अथ मोऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुते**
**।।कठोपनिषद्-2.3.14**

"जेव्हा मनुष्याच्या हृदयातील प्रत्येक कामना संपून जातात तेव्हा तो मर्त्य अमर होतो आणि ब्रह्मप्राप्ती चे सुख अनुभवतो."
मनात उत्पन्न होणाऱ्या सर्व कामनांचा पूर्ण त्याग करायचा हे स्थितप्रज्ञ व्यक्तीचे लक्षण.
असे करत असता ब्रह्म आणि आत्मा यांचे ऐक्य घडल्यामुळे, उच्च कोटीचे समाधान त्याला लाभते.
ह्या श्लोकात श्रीभगवानकृष्ण असे म्हणतात की हे पार्थ! जेव्हा मनुष्य आपल्या मनातील सर्व कामनांचा त्याग करतो, आणि स्वतः

स्वतःमध्येच संतुष्ट राहतो त्या स्थितीला स्थितप्रज्ञ असे म्हटले जाते.

**दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः।वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते।। श्रीमद्भगवद्गीता 2.56।।**

स्थितप्रज्ञतेचे दुसरे लक्षण ह्या श्लोकात सांगितले आहे. सामान्य व्यक्तीला हे वाचून फारसे पटणार नाही पण येथे ब्रह्मप्राप्ती च्या मार्गावर वाटचाल सुरू आहे आणि त्यातून स्थितप्रज्ञता आली आहे. आपल्या रोजच्या जीवनातही, मनाला फार क्लेश होऊ न देता आपले काम करत राहणे फायद्याचेच ठरते.
मुनि ह्या शब्दाचा संकलीत केलेला अर्थ असा, मौनम आचरति इति मुनि,
जो आपल्या तपश्चर्येदरम्यान मौन व्रत पाळतो. मन् धातू पासून तयार झालेला शब्द मनन, मनन म्हणजे विचार करणे. मुनी म्हणजे जो आत्मनिरीक्षण करतो किंवा विचारशील असतो. मौन म्हणजे मानसिक तप. ।श्रीमद्भगवद्गीता 17.16।।

धर्मशास्त्रातील उल्लेखांनुसार, मुनी म्हणजे सदैव स्वतःचा शोध घेणारी व्यक्ती. तसेच आपला बहुतांश वेळा विचार करण्यात घालवत असतो तो मुनी. मुनी ही विचारवंत आणि तत्त्वज्ञाला प्रदान करण्यात आलेली एक उपाधी आहे, असे सांगितले जाते. मुनी निसर्गाच्या संबंधातील उत्कट मानवी धाग्यांचा शोध घेत असतात. त्यांना ज्ञानाच्या कसोटीवर उच्च स्थान प्राप्त असते. त्यांनी अनंत काळ तपश्चर्या आणि साधनेच्या माध्यमातून ज्ञानार्जन केलेले असते. प्रत्येक मुनींचा वैचारिक दृष्टीकोन निराळा असतो.

**नासव ऋषिर यस्य मतं न भिन्नं (महाभारत, वन-पर्व 313.117)**

ह्या श्लोकात श्रीभगवानकृष्ण असे म्हणतात की दुःखे आली असता मनाला क्लेश होऊ न देणारा आणि आनंदाच्या भरात मनात कोणत्याही आस्था न बाळगणारा, ज्याच्या मनातून राग, भय आणि क्रोध नष्ट झाले आहेत अशा मुनीला स्थिरबुद्धि असे म्हटले जाते.

**यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम्। नाभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।। श्रीमद्भगवद्गीता 2.57।।**

आतापर्यंत महर्षी व्यासांनी वैयक्तिक पातळीवर निर्माण होणाऱ्या भावभावनांचा उल्लेख करून त्याप्रती असणाऱ्या स्थिर बुद्धी बद्दल सांगितले आता आपल्या भवताली घडणाऱ्या अनेक बऱ्यावाईट गोष्टींबद्दल ते सांगत आहेत. ज्ञानी व्यक्तींची स्थितप्रज्ञता अशा प्रसंगी सुद्धा दिसून येते.

शुभ अशुभ हे फक्त प्रसंग आणि एखाद्या गोष्टीपुरते मर्यादित न राहता ते व्यक्तीला सुद्धा लागू करून सामुहिक हेटाळणी करेपर्यंत मजल जाते. हा श्लोक आपल्यासाठी अशा परीस्थितीत मार्गदर्शक ठरावा. कोणत्याही परिस्थितीत आपण आपल्या मनाचा तोल ढळू न देणे महत्त्वाचे. ह्या श्लोकात श्रीभगवानकृष्ण असे म्हणतात की
जो सर्वत्र आसक्ती रहीत भावाने, शुभ अशुभ प्रसंगी आनंदी होत नाही आणि द्वेषही करत नाही त्याची स्थिर बुद्धी आहे.

**यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः। इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।। श्रीमद्भगवद्गीता 2.58।।**

आपल्या इच्छा आणि कामनांची पूर्ती झाल्याने मनाला समाधान लाभते की त्यापासून दूर गेल्याने? ह्या मानसशास्त्रीय मुद्यावर ह्या श्लोकात भाष्य केले आहे असे वाटते.

**न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।**
**हविषा कृष्णवर्मेव भूय एवाभिवर्धते ।।**
**श्रीमद्भागवतम्-9.19.14**

"जसे आगीत तुपाची आहुति दिल्याने आग शांत तर होत नाही उलट त्याची भीषणता वाढते. त्याच प्रमाणे कामनवासना उपभोगांनी शमत नाही.

स्थिर बुद्धी बद्दल सांगून झाल्यावर आता कासवाची उपमा देऊन हा श्लोक समजावून सांगितला आहे. कासव हा अतिशय मंदगती, म्हणजे स्थिरता, संयम आणि चिकाटी चे प्रतिक. स्थिरबुद्धिने आपल्या ध्येयाकडे वाटचाल करणारा.

आख्यायिकेनुसार कूर्म अवतार हा भगवान विष्णूंचा दुसरा अवतार. मंदिराच्या सुरवातीला दिसणारे कासव अध्यात्मिक उन्नतीचे प्रतिक आहे. जसे कासवाची 6 अंगे (4 पाय डोके आणि शेपूट), कासव आपल्या कवचाखाली ओढून घेतो तसेच काम, क्रोध, मद, मोह, मत्सर, लोभ ह्या दुर्गुणांना आत खेचून परमेश्वराला शरण जावे.
विविध वातावरणाशी आणि भौगोलिक प्रदेशाशी जुळवून घेणारे कासव, मंद हालचाली आणि कवचाच्या आवरणामुळे अपघात, जखम आणि संकटातून पार करण्याची क्षमता दर्शवतो.

अर्जुनाने 54 व्या श्लोकात विचारलेल्या प्रश्नाचे (समाधीस्थ पुरूष बसतो कसा? चालतो कसा? महर्षी व्यासांनी समर्पक उत्तर दिले आहे असे वाटते.
ह्या श्लोकाचा थोडक्यात अर्थ असा की ज्याप्रमाणे कासव आपले अवयव सर्व बाजूंनी आकुंचित करतो तसेच आपल्या इच्छा आकांक्षांना आवर घालणाऱ्या ची बुद्धि स्थिर असते.

**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**

..................................................



**सौ संगीता सतीश आठवले**

## वैदिक साहित्य आणि आरोग्य, चिकित्सा

**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**

**वैदिक साहित्य आणि आरोग्य, चिकित्सा**

आता आपण थोडे त्या काळातील आरोग्य आणि चिकित्सा ह्या विषयाचा आढावा घेऊ. अथर्ववेद सोडून बाकी सर्व वेद ब्रह्माच्या मुखातून बाहेर पडले असे म्हटले जाते. अथर्वन् ऋषींना झालेल्या साक्षात्कारातून अथर्ववेदांतील ऋचा निर्माण झाल्या. आयुर्वेदाला अथर्ववेदाचा उपवेद असे म्हटले जाते. आयुर्वेदातील औषधे आणि पंचकर्मे अथर्ववेदावर आधारित आहेत. ध्यान प्राणायाम आणि योगाभ्यास ह्यांचा उल्लेख अथर्ववेदात आहे.
ह्या सर्व गोष्टी आपल्याला माहीत आहेत म्हणून आपण पुढे जाऊया.
पतंजली हा शब्द आता सर्वांनाच माहीत आहे मात्र पतंजलींनी योगसूत्रात काय सांगितले आहे ह्याची माहिती फारशी कोणाला नसते. सहा अस्तिक दर्शनांपैकी (षडदर्शन) एक म्हणजे पतंजली योगसूत्र.

पतंजली योगसूत्रात आधुनिक मानसशास्त्रीय आधारित बऱ्याच गोष्टी सांगितल्या आहेत. पतंजली ऋषींना स्वयंभू असे पण म्हटले जाते कारण त्यांच्या जन्मा बददल फार माहिती उपलब्ध नाही. काही पौराणिक कथा प्रचलित आहेत पण त्या आजच्या काळात आपल्याला पटत नाहीत. त्या कथा वरून असे सुद्धा वाटते की पतंजली नावच्या 3 व्यक्ति असाव्यात. किंवा एकाच व्यक्तीने 3 प्रकारचे काम केले असावे. त्या तीन गोष्टी पैकी एक म्हणजे अर्थात पतंजलि योग सूत्र. याशिवाय त्यांनी आयुर्वेद आणि व्याकरण ह्या विषयावर सुद्धा लिहिले. पाणिनी ऋषींच्या अष्टाध्यायी ह्या ग्रंथावर आधारित महाभाष्य नावाचा ग्रंथ पतंजलि ऋषींनी लिहिला.
पातंजल तंत्र नावाचा तिसरा ग्रंथ हा आयुर्वेदावर आधारित आहे.
ह्या पतंजली ऋषींचे शिष्य कोण होते किंवा ते स्वतः कोणाचे शिष्य होते ह्याची माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे त्यांना स्वयंभू म्हणणे जास्त उचित वाटते.
तर अशा पतंजली मुनींच्या योगाभ्यास वर च्या ग्रंथाला योग दर्शन असेही म्हणतात. म्हणजे vision to yog.

सध्याच्या प्रचलित समजुती नुसार योगाभ्यास हा एक व्यायामाचा प्रकार समजला जातो, पण खरे तर ते तसे नसुन योगाभ्यास हा समाधि कड़े जाण्याचा मार्ग आहे. त्यासाठी करावी लागणारी शारीरिक आणि मानसिक तयारी म्हणजे योगाभ्यास (जी योगासने आपण करतो)
आताच्या परिस्थिती नुसार आपण योगासनांचा वापर आपले आरोग्य टिकवण्यासाठी करता येईल का असा विचार करत असलो तर ते बरोबरच आहे कारण Healthy mind and Healthy body असल्याशिवाय साधना करताच येणार नाही.

11 व्या अध्यायात श्रीभगवानकृष्णांनी अर्जुनाला दिव्य दृष्टि प्रदान केली असा उल्लेख आहे. आजच्या आधुनिक काळात हे कसे समजून घ्यायचे असा प्रश्न पडतो. अशा वेळी मला पतंजलींच्या योगसूत्रातील श्लोकांचा उल्लेख करावासा वाटतो.

**योगश्चित्तवृत्तिनिरोधः ॥१.२॥पतंजली योगसूत्र**

हा श्लोक आपल्याला माहीत आहेच. ह्यातील वृत्तीं बद्दल सांगताना पतंजली ऋषींनी त्याचे पाच प्रकार सांगितले आहेत.

**प्रमाणविपर्ययविकल्पनिद्रास्मृतयः ॥पतंजली योगसूत्र ॥ 1.6 ॥**

त्या म्हणजे प्रमाण, विपर्य विकल्प निद्रा आणि स्मृती. ह्यामध्ये विकल्प शब्दाचा अर्थ आहे कल्पनाशक्ती. त्याचे वर्णन पतंजलींनी 9व्या श्लोकात केले आहे.

**शब्दज्ञानानुपाती वस्तुशून्यो विकल्पः ॥ पतंजली योगसूत्र ॥ 1.9 ॥**

मानसशास्त्रात कल्पनाशक्ती वर बरीच पुस्तके सापडतात. जेव्हा एखादे दृश्य माध्यम अस्तित्वात नसते, किंवा उपलब्ध नसते त्यावेळी सांगितलेली गोष्ट म्हणजे आपली कल्पनाशक्ति. केवळ शब्द आणि विचार करण्याची क्षमता ह्यावर आपली कल्पनाशक्ति भरारी घेऊ शकते. त्यातून बऱ्याच अस्तित्वात नसलेल्या गोष्टी निर्माण होऊ शकतात जसे  नागमणी, उडणारा घोडा वगैरे.
जरूर वाचावे असे पतंजली योगसूत्र

**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**

**..............................................**



## आनंदाचे डोही आनंद तरंग !!

**श्रीमती सुमति आठवले, ९४०४६ ०९३४८**

मनुष्य हा समाजप्रेमी आहे. त्याला सर्वांच्या संपर्कात रहावयास खूप आवडते.अपवादात्मक फक्त एकटा जीव सदाशिव असतो. एकदा एक माणूस पादचारी मार्गावरून चालला होता. वाटेत त्याला एक दगड दिसला, म्हणून त्यांनी तो उचलला, नेमके त्याचवेळेस विरूद्ध दिशेने दुसरा एक येत होता. त्याच्या मनात विचार आला की तो माणूस हातातला दगड आपल्यावर  मारणार की काय? दुसऱ्याला वाटले की खरंच तो दगड उचलून त्याने दूर केला, नाहीतर कोणाला तरी ठेच लागून पडला असता!! आता ह्यात नकारात्मक, सकारात्मक मनोवृत्ती दृष्टीस पडतात.एखाद्याच्या कुरकुर, चिकित्सक मनोवृत्तीने मनात नकारात्मक भावना जागृत होते. एखाद्याचेवर झालेले संस्कार, परिस्थिती ह्याचा परिणाम त्याचेवर सकारात्मक झालेला असतो.

आपल्या वाईट वृत्तीना वेळीच अडसर घालावा लागतो.जीवनाकडे पहाण्याचा दृष्टीकोन अधिक व्यापक, विशाल करावयास हवा. मनोवृत्तीचा वेध घेताना सकारात्मक दृष्टीचा फायदा होतो.  छान झोप झालेली असते, दिवसभराच्या कामाचे नियोजन चालू असतांना अचानक कामाची बाई येणार नसल्याचा फोन येतो. मनःस्थिती केविलवाणी होते. एक मन म्हणते आजचा दिवस वाया गेला, दिवसभर काम एके काम!! तर दुसरे मन खुणावून सांगते, वरवरचे काम आटपून घे आणि निवांतपणे मॉलमध्ये हिंडून ये. तूला आज वेळेचे बंधन नाही. अशावेळेस दुसऱ्या मनाचे ऐकून दिवस छान घालविणे.

काहीवेळा मला ओशो (रजनीश) यांचे शब्दांची आठवण येते. ते म्हणतात जीवनात खूप खाचखळगे आहेत. त्यातून जातांना इजा ह्या होणारच,  मग त्याचा बाऊ करून कुरवाळीत रहावयाचे की दुखापत  झालेल्या भागाला मलमपट्टी करावयाची हे आपल्या हातात आहे.

पुष्कळ वेळेस आपल्या मनासारख्या गोष्टी घडत नसतात.तेव्हा मनात येते की हा त्रास, ताणतणाव मलाच का? बाकीच्यां इतराना का नाही? मला वाटते तेव्हा R E T (Rational Emotion Theory) चा नियम लावून आपणच आपले पायउतार व्हावे. त्यामुळेच सर्व काही निपटून जाते. वेळोवेळी संकटाची मालिका सुरू असते, तेव्हा META Physics चा नियम लक्षात येतो. हे सर्व घडणारच आहे. तेव्हा त्याला हसतमुखाने सामोरे जाऊन, मनाचा समतोल राखून सर्वांपुढे एक छानसे उदाहरण ठेवावयास हवे.

सकाळी उठल्यावर सर्व विधी पार पडल्यानंतर, केसांवर फिरवून, सुहास्याने दिवसाच्या शुभप्रभाती प्रत्येकाचे स्वागत करतो. आपला उर्जास्त्रोत इतराना देतो तर आपण इतरांकडून घेतो. दिवस कसा छान, मस्त घालवितो.

प्रत्येकाच्या आयुष्यात लहानमोठ्या घटना घडतच असतात. काहींच्यामुळे आनंद द्विगुणित होतो तर काहींच्यामुळे आनंदाला दुखावतो. आपल्या मनाची नाराजी कडवट शब्दानी, चेहऱ्यावरील हावभावांवरून प्रकट होत असते, ह्याची दखल स्वतःला सुध्दा नसते. परंतु शुध्द भावनेने गोड आणि रसाळ वाणीने दुसऱ्याची बोललो, स्वागत केले तर त्याचा परिणाम खरंच छान आनंदात होतो. सर्वच कसे आनंदी आनंद झाल्याचा प्रत्यय येतो.
वरील काही परिच्छेदावरून आपण निष्कर्ष काढू शकतो की आनंदाचे बीज आपल्या जवळच आहे.त्याला अंकुरित करण्यासाठी काही दाखले दिले आहेत,निराश करणारी बीजे मात्र वेळीच उपटून काढून टाकावयास हवीत. आनंदी आनंद गडे। इकडे तिकडे चोहीकडे॥

**श्रीमती सुमति आठवले, ९४०४६ ०९३४८**

.................................................

## वैदिक साहित्य आणि भांडवलदार

**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**

**वैदिक साहित्य आणि भांडवलदार**
अगदी सुरवातीला म्हटल्याप्रमाणे आपल्या संविधानातील अगदी महत्वाचा असा बिंदू म्हणजे 'समता'.विषमतेचा संबंध अर्थातच आपल्या अर्थव्यवस्थेशी जोडलेला असतो. भारतीय तत्त्वज्ञानात भांडवलशाही ला कोणतेही महत्व नाही, कारण तत्त्वज्ञानाच सगळा डोलारा निस्वार्थी वृत्ती आणि निष्काम कर्मावर उभारलेला आहे.

श्रीमद्भगवद्गीतेत अर्थव्यवस्थेवर जरी भाष्य केलेले नसले तरी भांडवलदारांच्या (द्रव्य संचय करण्याच्या ) मानसिकतेवर भाष्य केले आहे असे म्हणता येईल. त्यादृष्टीने 16 व्या अध्यायातील काही श्लोक पाहूया. ह्या अध्यायात दैवी आणि आसुरी गुणांवरभाष्य केले आहे.

**इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम्।**
**इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम्।।**
**श्रीमद्भगवद्गीता 16.13।।**

एखाद्या गोष्टीची गरज आणि इच्छा ह्यातील फरक लक्षात न घेतल्याने त्याचा परिणाम पर्यावरणाचा ऱ्हास होण्यावर होतो. आसुरी गुण असलेल्या व्यक्ती च्या मनात कसे विचार चालू असतात त्याचे वर्णन ह्या श्लोकात केले आहे. आपल्याला सुद्धा हे अगदी सहज लागू पडते. ह्या श्लोकात श्रीभगवानकृष्ण असे म्हणतात कीआज मी इतके काही कमावले आहे त्याने माझे मनोरथ पूर्ण होईल. माझ्या कडे इतकी संपत्ती आहे, त्यापेक्षा जास्त मी पुढे मिळवीन.

**असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि। ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी।। श्रीमद्भगवद्गीता 16.14।।**

श्रीभगवानकृष्णांनी आधीच सांगितले आहे की सर्व गोष्टींचा कर्ता करविता तेच आहेत हे मनात ठेऊन हा श्लोक वाचला पाहिजे. आधीच्या श्लोकात पैसे कमावण्याचे प्राविण्य संपादन केले की आत्मविश्वास वाढतो असे सांगितले, आता आत्मविश्वास वाढला की आसुरी गुणांची माणसे कसा विचार करतात ते सांगितले आहे. आत्मविश्वास, अती आत्मविश्वासात कसा रूपांतरित होतो, माणूस कसा आत्मकेंद्रित होतो हे सांगणारा हा श्लोक.

एका शत्रूचा मी काटा काढला (मारले) इतरांचा पण काटा काढीन. मी आता ईश्वर ( सर्वगुणसंपन्न), भोगी, सिद्धपुरूष, शक्तीमान आणि सुखी आहे.

**आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया। यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः।। श्रीमद्भगवद्गीता 16.15।।**

**अनेकचित्तविभ्रान्ता मोहजालसमावृताः। प्रसक्ताः कामभोगेषु पतन्ति नरकेऽशुचौ।। श्रीमद्भगवद्गीता 16.16।।**

थोड्याश्या यशाने हुरळून गेलेली व्यक्तींचे पाय जमिनीवर रहात नाहीत, त्याच्या कडे प्रचंड अहंकार असतो, स्वतः च्या क्षमतेबाबत बद्दल अनेक गैरसमज असू शकतात. ह्या सर्वाचा उपाय एकच ते म्हणजे स्वतःचे मूल्यांकन करणे, आपल्या विचारांना ज्ञानाची जोड देणे.

**अश्रुतश्च समुन्नद्धो दरिद्रश्य महामनाः। अर्थांश्चाकर्मणा प्रेप्सुर्मूढ इत्युच्यते बुधैः ॥ महाभारत ।। विदुरनीति ।। 33.30 ।।**

ज्ञानाशिवाय स्वतःला ज्ञानी समजून घमंडखोर असणारा , दरिद्री असूनही मोठ्या योजना आखणारा, काम न करता श्रीमंत होण्याची स्वप्ने बघणारा व्यक्ति मूर्ख समजला जातो.
ह्या श्लोकात असाच काहीसा विचार महर्षी व्यासांनी मांडला आहे. श्रीभगवानकृष्ण अर्जुनाला असे म्हणतात की (आसुरी गुणांच्या व्यक्ति असा विचार करतात की ) मी तर धनवान आहे, चांगल्या घरात जन्माला आलो आहे, माझ्या सारखे दुसरे आहेच कोण? मी मोठे यज्ञ करीन, दानधर्म करीन, मौजमजा करीन,

अशाप्रकारे अज्ञानामुळे स्वतःच्याच तंद्रीत असणारे, विविध भ्रम मनात असणारे, मोहजालात अडकून पडलेले, विविध प्रकारच्या कामेच्छा पासून दूर होऊ न शकणारे शेवटी अपवित्र नरकात जाऊन पडतात.

**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**

**..................................................**



## वैदिक साहित्य आणि आपण समारोप

**डॉ अनघा आठवले, ९०४९१ ४४२२२**

आतापर्यंत अनेक मुद्द्यांवर आपण चर्चा केली. हे सर्व वाचत असताना सध्याच्या जगात आपण नक्की कसे तरुण जावे , आपल्या तत्वांना मुरड घालून जगावे की आपल्या तत्वांशी तडजोड करून? असे बरेच प्रश्न आपल्या मनात येत राहतात. त्यावर पतंजली मुनींचा हा श्लोक मार्गदर्शक ठरावा. मनाची सातत्याने शुद्धता ठेवणे खूपच अवघड. समाजात राहताना आपल्यावर इतरांचा प्रभाव पडतच असतो. पण कोणाला जवळ करावे आणि कोणाला दूर ठेवावे हे सांगणारा हा श्लोक

**मैत्रीकरुणामुदितोपेक्षणां**
**सुखदुःखपुण्यापुण्यविषयाणां**
**भावनातश्चित्तप्रसादनम्॥**
**पतंजली योगसूत्र 1.33॥**

जेथे लोक सुखी दिसतात त्यांच्याशी मैत्री करा. जेथे दुःख दिसून येते त्याप्रती मनात करूणा उत्पन्न होऊ दे. जे लोक चांगले काम करताना दिसतात त्यांना मदत करा. आणि जेथे लोक वाईट काम करताना दिसतात त्यांच्यापासून दूर रहा, असे केल्याने चित्त एकाग्र आणि प्रसन्न होते. वैदिक साहित्याचे विविध पैलू आपण पहिले. आता प्रश्न उरतो , सध्याच्या काळात ह्या वैदिक साहित्याचे स्थान काय आहे ? ह्यावर सुद्धा चर्चा करायला हवी.

एका गोष्टीचा उल्लेख येथे आवर्जून करावासा वाटतो. आज आपल्या आजूबाजूला दिसणाऱ्या, आश्चर्यचकितकरणाऱ्या अनेक गोष्टींचे सुतोवाच आधीच आपल्या वैदिक साहित्यात करून ठेवले आहे असे सहज म्हणता येते. मी असे म्हणते कारण तसे भौतिक पुरावे आज उपलब्ध नाहीत. आतापर्यंत महाभारतातील संजय युद्धभूमीवरील हालचाल पाहू शकत होते हे अविश्वसनीय वाटायचे पण आज आपणच झूम च्या साह्याने आपण जगात कोणालाही पाहू शकतो.

तीच गोष्ट अवयव प्रत्यारोपणाची. गणपतीला हत्ती चे डोके लावता येणार नाही असेच आजही वाटते पण अशी अवयव प्रत्यारोपणाची कल्पना त्या काळात सुचली हे विशेषच.
प्राचीन युद्धातील निरनिराळ्या क्षेपणास्त्रांचे वर्णन आपल्याला अद्‌भुत जरी वाटले असेल तरी आज तशी क्षेपणास्त्रे तयार होत आहेत.
श्री. शिवकर तळपदे यांनी मरुत्सखा नावाचे एक मानव रहित विमान 1895 मध्ये राइट बंधूंच्या अगोदर उडवले होते असे म्हणतात , ते कोणत्या वेदकालीन दस्तावेजांच्या आधारे , ह्यावर आय आय टी कानपूर येथे संशोधन चालू आहे असे ऐकून आहे.

महर्षी व्यासांनी अतिशय आत्मविश्वासाने महाभारताचे अतिशय सार्थ वर्णन करून ठेवले आहे.

**धर्मे चार्थे च कामे च मोक्षे च भरतर्षभ । यदिहास्ति तदन्यत्र। यन्नेहास्ति न तत् क्वचित्॥ (महाभारत 1.62.53)**

"हे भरतर्षभ, धर्मात, अर्थात, कामात आणि मोक्षात जे काही आहे ते इतरत्र मिळू शकेल, पण जे या (महाभारत) ग्रंथात नाही ते दुसरीकडेही कुठेच नाही". याचा अर्थ महाभारतामध्ये धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांशी संबंधित सर्व गोष्टींचा समावेश केला आहे.

**वसुधैव कुटुम्बकम्** हे तत्व आपण आजही पाळतो. आधुनिक इतिहासाच्या सुरवातीपासूनच

आपले बाहेरील देशांशी व्यापारी संबंध होते. ज्यू आणि पारशी लोकांना आपण अगदी सहज आपल्यात सामावून घेतले.

**'यतो धर्मस्ततो जयः'** हे वाक्य महाभारतातील श्लोक (13.153.39) आहे. जे सर्वोच्च न्यायालयाने ध्येय वाक्य म्हणून स्वीकारले आहे.

**योग क्षेमं वहाम्यहम** श्रीमद्भगवद्गीता 9. 22 हे आपल्या सर्वांना चांगलेच माहित आहे.

आजपर्यंत अनेक संस्थांनी अशी संस्कृत ब्रीद वाक्ये स्वीकारली आहेत. सध्या तरी वैदिक साहित्याचा सामान्य माणसांशी एवढाच संबंध आहे असे वाटते.

अनेक ग्रंथांचा उल्लेख सुद्धा ह्या लेखात करता आलेला नाही अशी प्रचंड लिखित संपदा आजही उपलब्ध आहे (म्हणजे असा आरोप केला जातो की बरीचशी ग्रंथ संपदा परकीयांमुळे नष्ट झाली) त्या सर्वांचा अभ्यास आजही केला जात नाही.

आजची आपली सामाजिक स्थिती लक्षात घेता, वैदिक काळात आचरणात असलेल्या मूल्यांपासून आपण कुठे आलो आहोत ह्याचा सहजच अंदाज येतो. परमेश्वराला कळकळीने सांगावेसे वाटते आम्हाला परत वैदिक काळात घेऊन चला. अजून काय लिहावे.

**इति अनघा**

...............................................

## डॉ स्मिता रामकृष्ण, शैला मुकुंद आणि नागाव परिवार यांचे हार्दिक अभिनंदन

**1.Hearty Congratulations Dr Smita**

She got an opportunity to be a speaker and also as a moderator in the conference. Heartiest Congratulations Smita. We are proud of your achievements. All the Best!!!







...............................................

**2.शैला मुकुंद यांचे हार्दिक अभिनंदन**

'पं जितेंद्र अभिषेकी: कला आणि जीवनप्रवास' हा चरित्रग्रंथ ' राजहंस ' या

महाराष्ट्रातील मान्यवर प्रकाशन संस्थेनं प्रकाशित केला आहे. गेल्या वर्षी विद्यावाचस्पती विद्यावाचस्पति शंकर अभ्यंकर यांच्या हस्ते या ग्रंथाचं प्रकाशन झालं होतं . शैला मुकुंद यांनी या ग्रंथाचं लेखन केलं आहे .


शिष्य ,मैफल गायक, संगीतकार आणि गुरु ही अभिषेकीबुवांची संगीत विश्वातील चार रूपं . त्याविषयी ग्रंथात सविस्तर लिहिलं आहे .याबरोबरच आधुनिक संगीत रंगभूमीचे युगकर्ता संगीतकार हीसुद्धा त्यांची ठळक ओळख आहे. म्हणून त्यांच्या सर्व सतरा नाटकांचे उल्लेख नाटकात केले आहेत. विशेष म्हणजे नाटककार ,कलावंत , चाली देतानाचा अनुभव, काही बंदिशींचा पदांसाठी केलेला चपखल उपयोग ---- अशी अधिकची माहिती वाचायला मिळते .

याखेरीज गोवा - मंगेशी ही बुवांची जन्मभूमी असल्यामुळे पोतुर्गीज राजवट, गोव्यातील देऊळ संस्कृती , नवाथे झाले अभिषेकी , मुंबई महानगर, आकाशवाणी , कोकणी भाषेची चळवळ ,बुवांचे गुरु,गोडसे परिवार अशा विषयांचा समावेश पृष्ट्यसंख्येच्या मर्यादेत लेखिकेनं केला आहे. परिचित अभिषेकीबुवांबरोबरच अपरिचित बुवा हे या ग्रंथाचं वैशिष्ट्य म्हणावं लागेल-कथालेखक, संस्कृत आणि इंग्रजी विषयांचे पदवीधर, कवितेचा आणी संतसाहित्याचा अभ्यास ,विविध विषयांचा व्यासंग, छंद, संघर्षकाळ - - - - उच्चविद्याविभूषित अशा बुवांच्या पत्नी विद्याताईही इथं गुरुमाऊलीच्या रुपात भेटतात. त्यांच्याविषयी एवढं सविस्तर बहुदा प्रथमच लिहिलं गेलं आहे.

या ग्रंथलेखनाला अनेकांच्या आठवणींचा आधार मिळाला आहे. याचा लेखिकेनं कृतज्ञतेनं उल्लेख केला आहे. विशेषतः अभिषेकी परिवार , बुवांचे शिष्य ,नातेवाईक, स्नेही आणि कलावंतांनी भरभरून आठवणी सांगितल्यामुळे बुवांच व्यक्तिमत्व वेगवेगळ्या दृष्टीकोनातून लेखिकेला लिहिता आलं.

सहजसुंदर भाषा , छायाचित्रं आणि अनेक संदर्भांमुळे हा चरित्रग्रंथ संगीतप्रेमींनी जरूर वाचावा असा आहे. ' राजहंस ' प्रकाशन संस्थेनं अतिशय दर्जेदार निर्मिती केली आहे.

शैला मुकुंद यांना या चरित्रग्रंथसाठी तीन पुरस्कार मिळाले आहेत. दैनिक लोकमत समुहाचा ' सर्वोत्तम लक्षवेधी ग्रंथ ' पुरस्कार माननीय मंत्री श्री उदय सामंत यांच्या हस्ते मिळाला. महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे श्रेष्ठता पुरस्कार तर डोंबिवली पै फ्रेंड्स लायब्ररीचा ' मधुश्री ' पुरस्कार मिळाल आहे.




.................................................

## 3.नागाव परिवाराचे हार्दिक अभिनंदन




.................................................

## चांगल्या गोष्टी / बातम्या - ०६.१०.२०२५

**कुमार आठवले, ९४२२००७५६२**

नुकत्याच घडलेल्या व देशाच्या दृष्टीने चांगल्या, अशा खूप गोष्टी आहेत. पण त्यातील काही बातम्या खाली देत आहे. आपण यातील काही बातम्या कदाचित् वाचल्या असतील. तरी पण आपणासाठी परत एकदा पाठवत आहे.

**१)** *२ ऑक्टोबर रोजी "विजयादशमीला" राष्ट्रीय स्वयंसेवक "संघाच्या स्थापनेला १०० वर्षे" पूर्ण झाली. शताब्दी वर्ष सुरू झाले. आणि या वर्षासाठी अनेक कार्यक्रम आयोजित केले जात आहेत
*केंद्र सरकारनेही शताब्दी वर्षानिमित्त १०० रुपयांचे नवीन नाणे (ज्यावर भारत मातेचे चित्र व तिला प्रणाम करणारे स्वयंसेवक आहेत) व ५ रुपयांचे पोस्टाचे तिकीट छापले आहे. (ज्यावर २६ जानेवारी १९६३ च्या गणतंत्र संचलनातील संघाच्या सहभागाचे चित्र व सेवा कार्यातील स्वयंसेवकांचे चित्र आहे.)
*नेहमीप्रमाणे दसऱ्याला देशभर संघाची संचलने व विजयादशमी उत्सव साजरे झाले
*पुणे महानगरात एकूण ५७ सघोष संचलने झाली. व त्यात २३,२१८ स्वयंसेवक पूर्ण गणवेशात सामील झाले होते.

**२)** *२७ सप्टेंबर रोजी सैन्य दलाने भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड ला "३०,००० कोटी" रुपयांच्या "अनंत शस्त्र" ह्या "हवाई संरक्षण सामुग्री" खरेदीचे काम दिले. सिंदूर कारवाई दरम्यान ही प्रणाली यशस्वी ठरली होती.
*"डिआर् डिओ"ने विकसित केलेली जमिनीवरून हवेत मारा करणारी सुधारित "अनंत शस्त्र प्रणाली", पूर्वीचे नांव QRSAM (Quick Reaction Surface to Air Missile), ज्यामध्ये आधुनिक रडार, कमी पल्ल्याची क्षेपणास्त्रे, जॅमर्स, व लेसर यंत्रणा असेल. ही यंत्रणा ट्रक वरती ही बसवली जाईल. त्यामुळे त्याची हालचाल सुलभ होईल.
*यामध्ये दोन रडार असून एक १२० किलोमीटर पर्यंतचे, तर दुसरे ८० किमी पर्यंतचे ३६० डिग्री मधील लक्ष्य अचूक हुडकतात. तसेच ३० किलोमीटर पर्यंत च्या व १० किलोमीटर उंचीपर्यंतच्या लक्ष्याचा ही यंत्रणा अचूक वेध घेते.
*सध्या या यंत्रणेतील ९०% भाग हे स्वदेशी असून काही वर्षात ९९% भाग स्वदेशी असतील.

**३)** *संरक्षण मंत्रालयाने "पाचव्या पिढी"चे "अॅडव्हान्स मल्टीरोल कॉम्बॅट विमान" (AMCA) भारतात बनवण्याचा प्रकल्प जाहीर केला आहे. त्यामध्ये एल् अँड टी, टाटा, कल्याणी, अदानी, एच् ए एल् अशा एकूण ७ कंपन्यांनी / समूहांनी आपला मसुदा सादर केला आहे.
*पाचव्या पिढीचे हे विमान एका वैमानिकाचे, दोन इंजिन असलेले, रडारला न सापडणारे, अद्ययावत क्षेपणास्त्रे नेणारे, सर्व हवामानात वापरता येणारे व AI आधारित असेल. यामध्ये पहिल्या टप्प्यात ७०% पेक्षा जास्त भाग भारतीय असतील. इंजिन व काही गोष्टी परदेशी असतील. तर दुसऱ्या टप्प्यात शक्तिशाली इंजिनही भारतात बनवलेले असेल. डिआर् डिओ ने हे विकसित केले असून या सर्व कंपन्यांना उत्पादनासाठी त्यांचे सहकार्य मिळणार आहे.
*या विमानाचे प्रोटोटाइप २०२६ अखेरीस / २०२७ च्या सुरुवातीस सादर करायचे असून , त्याच्या छाननीनंतर २०३२ पर्यंत निर्मितीला सुरुवात करून २०३५ पर्यंत ही विमाने वायुदलात सामील केली जातील.

**४)** *२५ सप्टेंबर रोजी डीआरडीओ ने "रेल्वेच्या वॅगन" वरून मध्यम पल्ल्याच्या (२,००० किलोमीटर) अग्नि क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रक्षेपण केले. त्यामुळे आता रेल्वेने क्षेपणास्त्र कुठेही नेऊन वापरता येणे शक्य झाले आहे.
*जगामध्ये अमेरिका, रशिया, चीनच्या जोडीला आता भारत (४था देश) आला आहे.

**५)** *२५ सप्टेंबर रोजी भारतीय हवाई दलाने ९७ तेजस लढाऊ विमाने खरेदी चा ६३ हजार ३७०

कोटी रुपयांचा करार "एच् ए एल्" बरोबर केला. २०२७-२८ पासून ही विमाने हवाई दलाला मिळतील. यापैकी ६८ विमाने ही लढाऊ, एका वैमानिकाची असून २९ विमाने दोन वैमानिकांची शिक्षणाची आहेत.
*यापूर्वी २०२१ मध्ये हवाई दलाने "८३ विमानांची" "४८ हजार कोटीं"ची ऑर्डर "एच् ए एल्" ला दिली होती.
*एच् ए एल् आजकाल त्यांना लागणाऱ्या विमानांचे पार्ट मोठ्या प्रमाणात अन्य खाजगी उद्योगांकडून घेत असल्यामुळे आता विमानांचा लवकर पुरवठा करणे त्यांना शक्य होत आहे.
*नुकतेच विमानाला लागणारे पंख टाटांच्या कारखान्यात उत्पादन करून एच ए एल ला दिले गेले.

**६)** *२५ सप्टेंबर २०१४ रोजी "मेक इन इंडिया" ची घोषणा करण्यात आली.
*या २५ सप्टेंबर ला योजनेला ११ वर्षे झाली. या ११ वर्षात सर्व उद्दिष्टे जरी पूर्णपणे गाठली गेली नाहीत. तरी अनेक क्षेत्रात खूपच चांगली प्रगती झाली आहे.
*केंद्र सरकारने उद्योगाच्या प्रगतीसाठी २७ क्षेत्रे निवडली व त्यात पीएल् आय् योजना राबवली. त्यामुळे अनेक क्षेत्रात उत्पादन नवीन सुरू झाले किंवा वाढले.
*इलेक्ट्रॉनिक, संरक्षण, रस्ते, रेल्वे, इथेनॉल मिश्रण, बायो इकॉनॉमी वगैरे क्षेत्रातील उत्पादन वाढ लक्षणीय झाली.
*प्रथमच विमान निर्मिती, युद्ध नौका, पाणबुडी, वंदे भारत रेल्वे, इलेक्ट्रिक गाड्या, व त्यासाठी लागणाऱ्या बॅटरी, सोलर पॅनल व त्यांचे सेल अशा अनेक गोष्टी भारतात बनू लागल्या.
*७४,८७८ कोटी डॉलर ची परदेशी गुंतवणूक आली.
*व्यवसायातील सुलभतेत जगामध्ये भारताचा क्रमांक २०१४ मध्ये १४२ वा होता. तो २०२० मध्ये ६३ वा झाला. (पुढील आकडेवारी उपलब्ध नाही)
*पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्या. मालवाहतूक स्वस्त व जलद झाली. ऑक्ट्रॉय बंद झाला. जीएस् टी मुळे करात सुलभता आली. विजेची मागणी खूप वाढूनही कुठेही विजेची टंचाई जाणवत नाही.
*हजारो स्टार्टअप सुरू झाले. तसेच संशोधनही वाढले.

**७)** "२०१८ साली इस्रो" ने नवीन प्रकल्प जाहीर केला. ज्यामध्ये अंतराळातील अद्यापही उकल न झालेल्या अनेक गोष्टींचा अभ्यास करण्यासाठी प्रचंड क्षमतेच्या "अंतराळ दुर्बिणींची निर्मिती"
*इस्रो च्या निवृत्त अधिकारी श्री केंभावी यांच्या अध्यक्षतेखालील चमूने आलेल्या सर्व अर्जांचा अभ्यास करून "आय् आय् टी मुंबई" ची निवड केली. तेथील भौतिक विभागातील "प्रा. श्री वरुण भालेराव" यांच्या मार्गदर्शनाखाली अंतराळ दुर्बिणी साठी त्यांचा "दक्ष प्रकल्प" मान्य झाला. इस्रो ने बीज निधी दिल्यावर आयआयटी मुंबईने, पुण्यातील आयुका व अन्य दोन संस्थांच्या मदतीने, त्याचा सर्व आराखडा तयार करून सादर केला व तो मंजूर ही झाला. यामध्ये पृथ्वी च्या दोन्ही बाजूला दोन उपग्रहावर मोठ्या दोन दुर्बिणी बसवल्या जातील.
*सध्या "नासाची स्विफ्ट" व "नासा आणि युरोपची फर्मी" या दोन दुर्बिणी, जगात सर्वात अद्ययावत मानल्या जातात. "दक्ष प्रकल्पातील दुर्बीणी" ह्या फर्मीपेक्षा ५ पट आणि स्विफ्ट पेक्षा १३ पट जास्त क्षमतेच्या असतील.

**८)** *२७ सप्टेंबर रोजी "भारत संचार निगमने" (BSNL) उभारलेल्या "९२,६३३ टॉवरचे" उद्घाटन पंतप्रधान श्री नरेंद्र जी मोदी यांनी केले. यापैकी ९,००० टॉवर्स हे महाराष्ट्रात आहेत. तसेच भा. सं. निगमच्या संपूर्ण स्वदेशी 4G तंत्रज्ञान आधारित सेवेचे लोकार्पण ही त्यांनी केले
*१७ वर्षानंतर प्रथमच २०२४-२५ वर्षातील तिसऱ्या तिमाहीत २६२ कोटी व चौथ्या तिमाहीत २८० कोटी नफा" भा.सं. निगमने मिळवला.

कुमार आठवले.
९४२२००७५६२

.................................................